## वंचितच्या याचिकेवर ३ एप्रिलला सुनावणी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :
महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ ची प्रक्रिया आणि निवडणूक निकालावर वंचित बहुजन आघाडीने थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी चेतन चंद्रकांत अहिरे यांनी यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून, या याचिकेवर पुढील सुनावणी ३ एप्रिल रोजी होणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या याचिकेवर आज (२६ मार्च) सुनावणी होण्याची शक्यता होती. मात्र, न्यायालयाला हे प्रकरण सखोलपणे हाताळण्यासाठी पुरेसा वेळ मिळू न शकल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे.


Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018



महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात



* वर्ष ५१ * अंक २७० * * अकोला * गुरुवार, दिनांक २७ मार्च २०२५ ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)


अग्राग्रलेख

**खरीखरी..**

## भांडले खूप, वाजले सुप

कदा नेणो वोढी शरधिंतुनि काढी शर कदा
कदा धन्वीं जोडी वरिवरिहि सोडी तरि कदा
विपक्षाच्या वक्षावरि विवरलक्षास्तव रणी
कळे राजेंद्राची त्वरित शरसंधान करणी

हे स्वयंवर आख्यान मधील नळ राजाचे रणांगणातील वर्णन आहे. तो रणांगणात धनुष्याला कसा बाण लावतो, कशी प्रत्यंचा ओढतो आणि विपक्षाला रक्तबंबाळ करतो. हे कुणाला कळतही नाही. इतक्या कमी वेळात नळ राजा हे सर्व काही करीत असे. आपल्या महाराष्ट्र विधानसभेचे अधिवेशन अगदी तसेच कधी सुरू झाले. कधी रणांगणात बाचाबाची झाली. अधिवेशन कसे आणि केव्हा संपले. हे कुणालाच काही कळायच्या आतच सर्व मंत्री रात्री आराम करायला निघाले आणि आमदार गावोगावी पळाले. या अधिवेशनात काय झाले, यापेक्षा काय झाले नाही. याची चर्चा जास्त झाली. बिचा?या गरीब धनंजय मुंडे यांना आपली मुंडी खाली घालून घरी बसवण्यात आले. या निमित्ताने बीड जिल्ह्याचा महापराक्रम जो आतापर्यंत लपलेला होता. तो जाहीर झाला. विधानसभेतील महत्त्वाच्या प्रश्नापेक्षा विधानसभेच्या बाहेरील प्रश्नांना डोक्यावर घेऊन नाचणारे विरोधी पक्ष आणि सत्ताधारी यांची नामधारी लढाई महाराष्ट्राच्या जनतेने अनुभवली. शेतकरी मात्र वाऱ्यावरच्या वरातीत केव्हा लुप्त झाला, हे समजलेच नाही. बिचाऱ्या बहिणी आपल्या भावाकडून आपल्या मनीषा पूर्ण करण्याच्या अत्यानंदात मग्न होत्या. त्यांना सध्या मिळतात तेवढ्याच पंधराशे रुपयेच्या शिध्यावर समाधान मानावे लागले. आ. अबू असीम आझमी यांनी औरंगजेबावर स्तुतीसुमने उधळली. त्यामुळे जे घमासान झाले. ते जनतेने डोळे भरून पाहिले. त्याचा परिणाम म्हणून नागपुरात दंगलीचे थैमान माजले आणि दंगलखोर चक्क पोलिसांवरच हल्ले करू लागले. त्यातच एका पोलीस महिलेचा विनयभंग करताना दंगेखोरांना लाजलज्जा वाटली नाही. शेवटी त्याचे पडसाद विधिमंडळात उमटले. मुख्यमंत्र्यांनी आपल्या शहरातील या घटनेला गंभीरपणे घेतले आहे. दोषींना हुडकून काढू त्यांची संपत्ती जप्त करू आणि नुकसानग्रस्तांना भरपाई देऊ. असे आश्वासन विधिमंडळाच्या पटलावर स्वतः मुख्यमंत्र्यांनी दिले. हे प्रकरण मुख्यमंत्र्यांनी अतिशय जबाबदारीने हाताळल्याने आता नागपुरात पुन्हा शांतता प्रस्थापित झालेली आहे. विधिमंडळ सुरू असताना घडलेल्या या घटनेचे पडसाद सत्ताधारी आणि विरोधक दोघांच्याही भाषणातून उमटले. ते सर्व ठीक आहे. पण सर्वसामान्य जनतेच्या ज्या अपेक्षा आहेत. त्या कशा पूर्ण होणार. वाढलेल्या बेरोजगारीला आणि महागाईला कसे आटोक्यात आणणार. शेतक?यांना आपल्या उत्पादनाचा योग्य भाव कधी मिळेल. सरकारकडून आश्वासन दिल्याप्रमाणे त्यांची कर्जमाफी कधी होईल. हे प्रश्न अजूनही त्रिशंकूप्रमाणे लोंबकळतच आहेत. आमच्या लोकप्रतिनिधींना नको त्या प्रश्नाचे भांडवल करण्याची सवयच लागलेली आहे. त्यामुळेच ज्या प्रश्नांवर गंभीरपणे चर्चा झाली पाहिजे. ते प्रश्न आम्ही वर नमूद केल्याप्रमाणे तसेच कायम आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या सर्व बाबींची जाण आहेच. त्यांनी आता हे प्रश्न सोडवण्यासाठी खंबीरपणे पावली उचलली पाहिजेत. विधानसभेत अभ्यास करून त्या प्रश्नांवर बोलणारा नेताच आम्हाला दिसला नाही. ही आमची खंत आहे. एखादा जरी नेता यावर बोलला असता. तरी ग्रीष्म ऋतूत वसंत फुलला असे आम्हाला वाटले असते. म्हणजेच 'भांडले खूप आणि वाजले सुप' अशीच सारी परिस्थिती आहे. आपल्याला आता कर्जग्रस्त महाराष्ट्राला कर्जमुक्त करण्यासाठी पावले उचलायची आहेत. त्यामुळेच उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित दादांनी खरे खरे सांगून बरे बरे केले आणि फुकाची अशा बाळगू नका. हा संदेश दिला हे त्यातल्या त्यात बरेबरे झाले. यापूर्वीच्या अधिवेशनात आश्वासनांचे पर्वतच्या पर्वत धडाधड उभे केले गेले होते. तेव्हा जे आश्वासनांचे इमले बांधण्यात आले. त्याचा सत्ताधारी पक्षाला फायदा झाला व त्यांचे जमले. आता महाराष्ट्राच्या जनतेनेही यापुढे जमवून घ्यावे. हा त्यांचा संदेश जनतेने स्वीकारावा आणि महाराष्ट्राच्या विकासाला हातभार लावावा. असाच या अधिवेशनाचा अर्थ आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# आंबेडकरांचे स्वप्न मोदींनी पूर्ण केले

## चंद्र, सूर्य असेपर्यंत संविधान कोणीही बदलू शकत नाही – फडणवीस

## अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे सूप वाजले

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :
राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे आज सूप वाजले. दोन्ही सभागृहांत संविधानावर चर्चा करण्यात आली. या चर्चेत सत्ताधारी व विरोधकांनी एकमेकांवर शेलक्या शब्दांत टीका करून संविधानाचे महत्त्व पटवून दिले.

या अधिवेशनात जागतिक महिला दिन आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशतकोत्तर वर्षानिमित्त मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा झाली. तसेच भारतीय गणराज्याच्या ७५ व्या वर्षानिमित्त भारताच्या संविधानाची गौरवशाली अमृतमहोत्सवी वाटचाल या विषयावर चर्चा घेण्यात आली. आता विधानसभेचे पुढील अधिवेशन सोमवार ३० जून २०२५ रोजी होणार आहे.

दरम्यान, या अधिवेशनात लाडक्या बहिणींच्या अनुदानाची रक्कम १५०० रुपयांवरुन २१०० रुपये करण्यात येईल, अशी अपेक्षा होती. मात्र, ती फोल ठरली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, जम्मू आणि काश्मीरमधील कलम ३७० संपवून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पूर्ण केले. जोपर्यंत चंद्र आणि सूर्य आहे, तोपर्यंत भारताचं संविधान कोणीही बदलू शकत नाही.

फडणवीस म्हणाले, भारताचे संविधान हे १०-१२ देशांच्या संविधानातील गोष्टींपासून तयार झाल्याचा आरोप करतात. पण तसे नाही. हे पूर्णतः भारतीय तत्वांवर तयार करण्यात आलेले संविधान आहे.

संविधान सभेमध्ये भारताच्या ध्वजावर चर्चा सुरू होती, तेव्हा राधाकृष्णन म्हणाले, जोवर आपण सद्गुणांवर चालत नाही, तोवर आपण पवित्रतेचे ध्येय साध्य करू शकत नाही किंवा सत्यही गाठू शकत नाही. अशोक चक्र हे कायद्याचे व धमार्चे चक्र आहे. सत्य गाठायचे असेल तर धर्माच्या वाटेनेच जावे लागेल. त्यामुळे या ध्वजाखाली जो काम करेल, सत्य व धर्म त्याचे आचरणाचे तत्व असले पाहिजे.

धर्म हे सातत्याने पुढे जाणारे गतिमान असे चक्र आहे. यापूर्वीच्या काळात आपल्याला जो त्रास सहन करावा लागला, तो बदलांना प्रतिकार केल्यामुळे... आपल्यापुढे अनेक आव्हाने आहेत. काळाच्या बरोबरीने चालण्याचे धैर्य आपण दाखवले नाही तर आपण मागे राहू.

जात, अस्पृश्यता हे जोपर्यंत आपण त्यागत नाही, तोवर आपण सत्य व सद्गुणांचा वारसा सागू शकत नाही. हे चक्र आपल्याला हेच सांगते की, एका ठिकाणी थांबलो की एकेठिकाणी थांबलो तर मृत्यू आहे, ते चक्र सतत फिरत राहिले तर तिथेच जिवन आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. दरम्यान, यापूर्वी संविधानावरील चर्चेत महायुतीचे अनेक मंत्री तसेच विरोधकांनीही भाग घेतला.



### विषमता दूर होईपर्यंत आरक्षण

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संविधानात ५० वर्षांसाठी आरक्षण दिले होते. त्यावेळी त्यांना असे वाटले होते की, ५० वर्षांत हा देश आपली विषमता संपवू शकेल. दुर्दैवाने आमच्या समाज व्यवस्थेने ही विषमता दूर केली नाही. त्यामुळे पहिल्यांदा अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये त्याला मुदतवाढ देण्यात आली. नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने या आरक्षणाला मुदतवाढ दिली.
जोपर्यंत ही विषमता आहे, तोपर्यंत आम्ही संधीची समानता हे जे काही आपले संवैधानिक मूल्य आहे, त्या मूल्यांप्रती सगळे समानस्तरावर येईपर्यंत हे आरक्षणच कायमच ठेवावे लागेल हे देखील या निमित्ताने आपण मान्य केले पाहिजे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे समाजात मोठे परिवर्तन झाल्याचेही ते म्हणाले.

### अधिवेशन सत्र कालावधीतील कामकाजाची आकडेवारी

एकूण बैठकींची संख्या - १६
प्रत्यक्ष झालेले कामकाज - १४६
अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ - १ तास २५ मिनिटे
रोजचे सरासरी कामकाज - ९ तास ७ मि.
तारांकित प्रश्न
प्राप्त प्रश्न - ६९३७
स्वीकृत प्रश्न - ४९१
उत्तरीत झालेले प्रश्न - ७६
**अल्पसूचना प्रश्न**
प्राप्त प्रश्न - १४
अस्वीकृत - १३
संमिलित - १
**अल्पकालीन चर्चा**
प्राप्त सूचना - २, मान्य - १, अमान्य - १
एकूण प्राप्त लक्षवेधी सूचना - २५५७
स्वीकृत सूचना - ४४२
चर्चा झालेल्या सूचना - १२९
**नियम ९७ अन्वयेच्या सूचना**
प्राप्त सूचना - ६०
मान्य - निरंक
चर्चा झाली - निरंक
**शासकीय विधेयके**
प्रस्तापित - ९
संमत - ९
विधान परिषद संमत - ३
**अशासकीय विधेयके**
प्राप्त सूचना - ४२, मान्य - २२

## ईलेक्ट्रिक व्हेईकल्स टॅक्स फ्री?

### फडणवीस यांची विधान परिषदेत घोषणा मंत्र्यांसह अधिकाऱ्यांना मिळणार ईव्ही

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत एका प्रश्नाला उत्तर देताना राज्यात इलेक्ट्रिक वाहने करमुक्त करण्याची घोषणा केली. सद्यस्थितीत आपण ३० लाखांपर्यंतच्या ईव्ही वाहनांना कोणताही कर लावत नाही. त्यावरील वाहनांना ६ टक्क्यांचा नाममात्र कर लावला जातो. पण आता तो ही कर मागे घेतला जाईल. अर्थमंत्री अजित पवार हे याविषयी विधानसभेत घोषणा करतील, असे फडणवीस यांनी सांगितले.

आमदार अनिल परब यांनी बुधवारी विधान परिषदेत प्रदुषणाचा मुद्दा उपस्थित केला. मागच्या काळात रस्त्यांचे डिप क्लिनिंग होत होते. मागचे मुख्यमंत्री स्वतः रस्ते धुवायला जायचे. आत्ताचे मुख्यमंत्री जाणार का? असा खोचक सवाल अनिल परब यांनी यासंबंधी केला. त्यावर भाष्य करताना देवेंद्र फडणवीस यांनी हसत परब यांनी मला रस्त्यावर आणण्याचाच निश्चय केला आहे अशी टिप्पणी केली. त्यांच्या या विधानाने सभागृहात हास्याचे फवारे उडाले.

**सर्वच ईव्ही वाहने करमुक्त**

फडणवीस पुढे म्हणाले, अनिल परब यांनी मांडलेला मुद्दा अतिशय योग्य आहे. आपण आपल्या राज्यात ईव्हीवर जाणिवपूर्वक कोणताही कर लावला नाही. आपण त्याची एक इकोसिस्टीम तयार केली. मंत्रिमंडळात चर्चा होताना सामान्यतः एक सूर असा आला की, ३० लाखांपर्यंतच्या ईव्हीला मोकळे ठेवले पाहिजे आणि ३० लाखांवरील लक्झरी सेग्मेंटला ६ टक्के कर लावला होता. तथापि, काल माझी दोन्ही उपमुख्यमंत्री व अधिकारी वर्गासोबत बैठक झाली. त्या बैठकीत ईव्हीच्या ३० लाखांवरील सेग्मेंटमध्ये सध्या कोणत्याही गाड्या उपलब्ध नाहीत. त्यातून करही मिळणार नाही. त्यामुळे हा कर मागे घेण्याचा निर्णय झाला. सरकार यापुढे हा कर लावणार नाही.

## राज्य सरकार तात्काळ बरखास्त करा...

### काँग्रेसची राज्यपालांकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :
राज्यात कायदा सुव्यवस्था पूर्णतः ढासळली असून मुख्यमंत्री व मंत्र्यांची वर्तणूक संविधानविरोधी आहे. धार्मिक तेढ निर्माण करून सामाजिक सौहार्द बिघडवण्याचा महायुती सरकारचा हेतू आहे. त्यामुळे हे सरकार तात्काळ बरखास्त करावे, अशी मागणी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे केली.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने नागपूर हिंसाचारासह राज्यातील वाढत्या असुरक्षिततेबाबत सविस्तर निवेदन राज्यपालांना दिले. या वेळी विजय वडेट्टीवार, माणिकराव ठाकरे, डॉ. नितीन राऊत, आ. अमिन पटेल, आ. भाई जगताप, आ. विकास ठाकरे, आ. राजेश राठोड, आ. संजय मेश्राम, आ. बाळासाहेब मांगुळकर, मोहन जोशी, राजेश शर्मा, सचिन सावंत आदी उपस्थित होते.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, भाजपाच्या मातृसंस्था आणि मंत्र्यांकडून जाणूनबुजून धार्मिक तेढ वाढवण्याचा प्रयत्न सुरू आहे. औरंगजेबाच्या कबरी विरोधात भाजप परिवारातील संस्था आंदोलन करतात, तर मंत्री नितेश राणे वारंवार वादग्रस्त विधाने करतात. तरीही मुख्यमंत्र्यांकडून कोणतीही कारवाई केली जात नाही.

औरंगजेबाची कबर केंद्र पुरातत्व विभागाच्या संरक्षित यादीत असून राज्य सरकारचीही जबाबदारी आहे. मात्र, सरकारच सामाजिक सलोखा बिघडवण्याचे काम करत आहे, असा आरोप त्यांनी केला.

## सोमनाथ सूर्यवंशी मृत्युप्रकरणाचा सीआयडीकडे तपास

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :



परभणी हिंसाचार प्रकरणात पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या सोमनाथ सूर्यवंशीचा न्यायालयीन कोठडी मृत्यू झाला होता. सुरुवातीला हा मृत्यू ह्दयविकाराच्या झटक्याने झाल्याचे सांगण्यात आले होते. परंतु, सोमनाथ मृत्यू मारहाणीमुळे झाल्याचे शवविच्छेदन अहवालातून समोर आले होते. सव्वातीन महिन्यांनंतर आता सोमनाथ सूर्यवंशीच्या मृत्यू प्रकरणाचा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला आहे. सोमनाथ सूर्यवंशीच्या कुटुंबीयांनी न्यायाची मागणी केली असून उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

सोमनाथ सूर्यवंशी याचा १६ डिसेंबर २०२४ रोजी न्यायालयीन कोठडीत असताना मृत्यू झाला होता. त्याच्या शवविच्छेदन अहवालात मारहाणीमुळे मृत्यू झाल्याचे समोर आले होते. तसेच सोमनाथचा मृत्यू मारहाणीत झाल्याचे न्यायदंडधिकाऱ्यांच्या अहवालात म्हटले आहे. सोमनाथच्या मृत्यूला पोलिस जबाबदार असल्याचेही अहवालातून पुढे आले आहे. आता या प्रकरणाचा तपास सीआयडीकडून करण्यात येणार आहे. त्यामुळे या प्रकरणात आरोपींवर हत्येचा गुन्हा दाखल करण्याची शक्यता आहे.

सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणाचा तपास सीआयडीकडून करण्यात येणार असला, तरी आम्हाला न्याय हवाय, अशी मागणी सोमनाथच्या कुटुंबीयांनी केली आहे. आता न्यायमूर्ती तेलगावकर यांच्या अहवालातही पोलिसांच्या मारहाणीत सोमनाथचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे .मात्र तरीही सरकार न्याय देत नाही .जे जे दोशी आहे तर त्यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे.

## विधानभवन परिसरात झाडावर चढून आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :
विधानभवन परिसरात एका तरुणाच्या अनोख्या आंदोलनाने खळबळ उडाली. बीड जिल्ह्यातील शेतकरी नेता ईश्वर शिंदे या तरुणाने विधानभवन परिसरातील एका झाडावर चढून आपल्या मागण्यांसाठी आंदोलन केले.

या घटनेमुळे परिसरात बघ्यांची मोठी गर्दी जमली असताना, प्रशासन आणि आमदारांनी त्याला खाली उतरवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. अखेरीस धुळे येथील भाजप आमदार अनुप अग्रवाल यांनी क्रेनच्या साहाय्याने झाडावर जाऊन ईश्वर शिंदेची मनधरणी केली आणि त्याला खाली उतरवण्यात यश मिळवले.

ईश्वर शिंदे हे बीड जिल्ह्यातील रहिवासी असून, ते शेतकरी नेता म्हणून परिचित आहेत. त्यांनी आपल्या आंदोलनादरम्यान हातात राष्ट्रवादी काँग्रेस (अजीत पवार गट) नेत्यांचे फोटो असलेले बॅनर झळकावले होते.

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी त्यांनी हे पाऊल उचलल्याचे सूत्रांनी सांगितले. विधानसभेचे अधिवेशन सुरू असताना त्यांनी विधानभवन परिसरात झाडावर चढून आपला आवाज सरकारपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. आमदार अग्रवाल यांनी त्याला खाली आणले.

## आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :
राज्यातील आयएएस अधिकाऱ्यांची खांदेपालट अद्यापही सुरूच आहे. गेल्याच आठवड्यात सहा आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्यानंतर आज पुन्हा पाच आयएएस अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश जारी करण्यात आले आहेत.

सांगलीचे आयुक्त शुभम गुप्ता यांच्याकडे नागपुरात बदली करण्यात आली असून त्यांची विदर्भ वैधानिक विकास मंडळ सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एच. पालवे यांची बदली मुंबईतील महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ येथे व्यवस्थापक संचालकपदी करण्यात आली आहे

२०२० बॅचच्या मध्य प्रदेश कॅडरच्या आयएएस अधिकारी अंजली रमेश यांनी अहमदाबाद येथून एमबीएचे शिक्षण पूर्ण केले असून त्यानंतर त्यांनी आयआयटी मद्रास येथून बीटेक आणि एमटेक पूर्ण केले आहे. मध्य प्रदेश राज्यात त्यांनी उपविभागीय अधिकारी, सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून काम केले आहे. आता त्यांची हिंगोली जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

बी. एच. पालवे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांना महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई येथे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

मनोज रानडे संचालक, नगर प्रशासन, मुंबई यांना जिल्हा परिषद, पालघर येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

शुभम गुप्ता महानगरपालिका आयुक्त, सांगली यांना विदर्भ वैधानिक विकास मंडळ, नागपूर येथे सदस्य सचिव म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

## अंधारे, कामरा विरोधात विधान परिषदेत हक्कभंग

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर व्यंगात्मक गाण्याद्वारे अप्रत्यक्ष टीका केल्याच्या आरोपावरून स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा आणि शिवसेना (ठाकरे गट) उपनेत्या सुषमा अंधारे यांच्यावर विधान परिषदेत हक्कभंग प्रस्ताव मांडण्यात आला. महायुतीच्या सदस्यांनी हे हक्कभंग प्रस्ताव सादर केले असून यावर चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाईल, अशी ग्वाही राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली.



कुणाल कामरा यांनी एका स्टँडअप कार्यक्रमात शिंदे यांच्यावर व्यंगात्मक गाणे सादर केले होते. त्यानंतर संतप्त शिवसैनिकांनी संबंधित स्टुडिओवर हल्ला करत तोडफोड केली. यानंतर राज्यभरात याचे तीव्र पडसाद उमटले. विधानभवनात देखील यावरून चांगलाच गदारोळ झाला.

शिवसेना (ठाकरे गट) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी कामरा यांच्या या व्हिडीओची जाहीर पाठराखण करत भाजप नेत्यांच्या महापुरुषांविरोधातील वादग्रस्त वक्तव्यांचा दाखला दिला. भाजपचे नेते प्रविण दरेकर यांनी अंधारे यांच्या विधानाचा दाखला देत, अंधारे आणि कामरा यांनी सभागृहाचा अवमान केल्याचा आरोप करत हक्कभंग प्रस्ताव मांडला. या दोघांनी शिंदे यांचा थेट उल्लेख करत दोन्ही सभागृहाचा अपमान केला, असा आरोप करण्यात आला.

यावेळी शिवसेनेचे (शिंदे गट) सदस्य हेमंत गोडसे यांनी कामरा यांचे अर्बन नक्षलवादी उमर खालिदसोबतचे फोटो सोशल मीडियावर प्रसारित झाले असल्याचा उल्लेख करत आरोप केला की, कुणाल कामरा दंगली घडविण्याच्या मानसिकतेतून हे प्रकार करत आहे. सध्या तो परराज्यात फरार असून त्याच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणीही गोडसे यांनी केली.

## इराणी व नायजेरियन वस्त्यांमध्ये पोलिसांचे कोम्बिंग ऑपरेशन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :
ठाणे जिल्ह्यातील आंबिवली येथील इराणी वस्ती तसेच राज्यातील नायजेरियन वस्त्यांमध्ये पोलिसांचे कोम्बिंग ऑपरेशन राबवून सराईत गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधान परिषदेत दिली.

पोलिसांवर हल्ले करणाऱ्या गुन्हेगारांवर मोक्कासह कठोर कारवाई होणार असून महिलांचाही वापर गुन्हेगारीसाठी झाल्यास त्यांच्यावरही मोक्का लावण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

आंबिवली येथील इराणी वस्तीत आठ-दहा पिढ्यांपासून इराणी समाज राहतो. येथे सुमारे दोन हजार इराणी असून, त्यांनी पोलिसांवर पाच वेळा प्राणघातक हल्ले केले आहेत. महिलाही गुन्हेगारांना वाचवण्यासाठी पोलिसांवर हल्ला करतात, अशी माहिती भाजप गटनेते प्रवीण दरेकर यांनी दिली.

गृहराज्यमंत्री कदम म्हणाले, इराणी व नायजेरियन वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी वाढली आहे. आंबिवलीतील वस्तीमध्ये पोलिसांचे कोम्बिंग ऑपरेशन राबवले जाईल. महिलांनी गुन्हेगारांना पळवून लावल्यास त्यांच्यावरही मोक्काची कारवाई केली जाईल.

## कल्याणच्या चोराचे चेन्नईत एन्काऊंटर

### १० किलो सोन्याची चोरी करताना पोलिसांनी उडवले

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :
ठाणे जिल्ह्यातील कल्याण आंबिवलीत राहणाऱ्या एका चोराचे पोलिसांनी चेन्नईत एन्काऊंटर करण्यात आले आहे. ही घटना काल मंगळवारी घडली. त्याची माहिती चेन्नई पोलिसांनी आज कल्याण पोलिसांना दिली. त्यानंतर ही गोष्ट उजेडात आली.

जाफर गुलाम इराणी असे एन्काऊंटर करण्यात आलेल्या चोराचे नाव आहे. जाफर इराणी हा कल्याण आंबिवली परिसरातील इराणी वस्तीत राहत होता. चोरांची एक टोळी विमानाने दुसऱ्या राज्यांत जावून चोरी करायची. या टोळीत जाफर इराणीचा समावेश होता. चेन्नई पोलिसांनी मंगळवारी जाफर इराणीचा एन्काऊंटर केला. या घटनेत त्याचे सलमान मेश्राम व अमजद इराणी हे २ सहकारी गंभीर जखमी झाले. हे तिघेही पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, महाराष्ट्र पोलिसांनी वरील तिघांच्या अनेकदा मुसक्या आवळल्या. त्यांना तुरुंगातही डांबले. पण त्यानंतरही ते सुधारले नाही. ते सातत्याने परराज्यात जावून चोरी करायचे. मंगळवारी ते चोरी करण्याच्या उद्देशाने चेन्नईला गेले. तिथे त्यांनी तब्बल १० किलो सोन्याची चोरी केली. त्यानंतर ते हे सोने घेऊन पळून जात असताना त्यांची पोलिसांसोबत झटापट झाली. या झटापटीत जाफर गुलाम इराणी हा पोलिसांच्या गोळीबारात ठार झाला. तर सलमान मेश्राम व अमजद इराणी हे दोघे गंभीर जखमी झाले. या



घटनेची माहिती चेन्नई पोलिसांनी कल्याण पोलिसांना दिली. तसेच आरोपींच्या नातेवाईकांनाही कळवले. या माहितीनुसार, आरोपींचे नातेवाईक कल्याण आंबिवलीवरून चेन्नईला मृतदेह आणण्यासाठी गेले आहेत.

या प्रकरणाची माहिती देताना चेन्नईचे पोलिस आयुक्त ए अरुण म्हणाले की, जाफर आणि त्याच्या २ सहकाऱ्यांचा चेन्नईमध्ये २५ मार्च रोजी घडलेल्या चेन स्नॅचिंगच्या घटनांमध्ये समावेश होता. तिसऱ्या आरोपीला चेन्नई सेंट्रल रेल्वे स्थानकातून अटक करण्यात आली. तेव्हा हा आरोपी हैदराबादला जाणाऱ्या ट्रेनमध्ये बसणार होता. अटक करण्यात आलेले तिन्ही आरोपी इराणी दरोडेखोर टोळीशी संबंधित आहेत. त्याच्या मोटरसायकलमध्ये पिस्तुल सापडले आहे.

# दिशा सालियनच्या मारेकऱ्याला सोडणार नाही - मंत्री देसाई



■ **मुंबई :** संजय गायकवाड यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री शंभूराज देसाई म्हणाले, आमदार संजय गायकवाड यांनी दिशा सालियान मृत्यूविषयी प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांनी नैतिकतेच्या आधारावर आदित्य ठाकरे यांच्या आमदारकीचा राजीनामा घेण्याची मागणी केली आहे.

त्यांचा राजीनामा घ्यायचा किंवा नाही हा त्यांच्या पक्षाचा निर्णय आहे. सरकार म्हणून आम्ही त्यावर भाष्य करणार नाही. पण पहिल्या दिवसापासून सरकारने भूमिका स्पष्ट केली आहे की, या प्रकरणातील कोणत्याही आरोपीला सोडणार नाही.

गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधान परिषदेत बोलताना दिशा सालियन प्रकरणाची चौकशी एसआयटीने क्लोज केली नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे दिशा सालियान यांच्या वडिलांनी पोलिसांकडे काही तक्रार दिली असेल. त्यांच्याकडे यासंबंधीची अधिकची माहिती दिली असेल. त्यांनी काही संशय व्यक्त केला असेल, तर त्या सगळ्याचा अहवाल पोलिसांकडून अहवाल मागवला जाईल आणि ही माहिती एसआयटी चौकशीच्या माध्यमातून न्यायालयासमोर आणली जाईल, असेही शंभूराज देसाई यासंबंधी बोलताना म्हणाले.

## आदित्य ठाकरे नैतिकता म्हणून राजीनामा देणार का? संजय गायकवाड



■ **मुंबई :** दिशा सालियान हिचे वडील सतीश सालियान आणि तिच्या आईने काल पोलीस आयुक्तांची भेट घेऊन आमच्या मुलीच्या हत्या प्रकरणात आमदार आदित्य ठाकरे यांचा थेट सहभाग असल्याचा आरोप केला आहे. आता तर दिशा सालियान हिच्या वडिलांनीच आदित्य ठाकरेंचा त्यांच्या मुलीच्या हत्येत सहभाग असल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे आदित्य ठाकरे नैतिकता म्हणून राजीनामा देणार का? किंवा अध्यक्ष महोदय, आपण त्यांच्यावर काही कारवाई करणार का?, असा सवाल शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात उपस्थित केला.

## शिंदे म्हणजे महाराष्ट्रात चेष्टेचा विषय

■ **मुंबई :** महाराष्ट्रात चाळीस आमदारांनी गद्दारी केली व एक घटनाबाह्य सरकार बनवले. त्यावर प्रचारात राळ उठली. सुप्रीम कोर्टबाजी झाली. खोक्यांवरच्या घोषणा गाजल्या. कुणाल कामराने विडंबन गाण्यात हेच सांगितले. त्यामुळे त्यात नवीन काय? नव्या बाटलीत जुनीच दारू आहे. त्या जुन्या दारूची नशा शिंदेंच्या लोकांना अशी चढली की, त्यांनी कामराच्या स्टुडिओवर हल्ला केला. कामरा प्रकरणात शिंदे हे पुरते बदनाम झाले. शिंदे म्हणजे महाराष्ट्रात चेष्टेचा विषय बनला आहे. भाजप आणि फडणवीस मजा घेत आहेत. या चेष्टेखोरीत महाराष्ट्रही हास्यास्पद ठरला, हे बरे नाही. अशा शब्दात उद्धव ठाकरे गटाने एकनाथ शिंदेंवर टीका केली आहे.

# ११४ कोटींची गणवेश खरेदी संशयास्पद

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ :**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार एकनाथ खडसे यांनी आज विधान परिषदेत अंतिम आठवड्याच्या प्रस्तावावरील भाषण करताना राज्यात विविध विभागांत सुरू असलेल्या भ्रष्टाचारावरून सरकारला धारेवर धरले.



यावेळी त्यांनी आदिवासी विभागातील भ्रष्टाचाराविषयी बोलताना सरकारवर आसूड ओढले. आदिवासी विकास विभागात मागच्या महिन्यात ११४ कोटीचे गणवेश खरेदी झाली. ही सगळी खरेदी आवश्यक नसताना झाली.
आरोग्य, आदिवासी, परिवहन, पीडब्ल्यूडी खात्यात भ्रष्टाचार सुरू आहे. पाटबंधारे खात्याचा भ्रष्टाचार काढला तर तुमचे डोळे पांढरे होतील, असे एकनाथ खडसे म्हणाले. या निवडणुकीच्या कालखंडात पाटबंधारे खात्यामध्ये ८०० ते १ हजार कोटींचे टेंडर काढले. पाणी नाही, पण पाईपलाईनचे टेंडर काढले, असा आरोप एकनाथ खडसे यांनी विधान परिषदेत बोलताना केला.

**एकनाथ खडसेंनी उपस्थित केलेले प्रकरण**

एक कोटीपेक्षा अधिक रकमेची खरेदी दर करारावर न करता रीतसर निविदा प्रक्रिया राबवूनच केली जावी, या शासनाच्या आदेशाला फाटा देत आदिवासी विकास विभागातर्फे तब्बल ११४ कोटींची गणवेश व नाइट ड्रेस खरेदी दर करारावर करण्यात आल्याचे पुढे आले आहे. एवढेच नव्हे तर त्यातील सुमारे ७२ कोटींची देयके पुरवठादार संस्थेला अदाही केली गेली आहेत.

विशेष म्हणजे, १५ मार्च २०२४ रोजी एकाच दिवशी ९५ कोटींच्या गणवेश पुरवठा आदेशाच्या फाइलवर आदिवासी विकास विभागाच्या लिपिकापासून ते सचिव आणि तत्कालीन मंत्र्यांपर्यंत सहा जणांच्या स्वाक्षऱ्या आहेत. शिवाय, त्याच दिवशी मान्यतेचे पत्र आदिवासी विकास आयुक्तालयाला प्राप्त होऊन तत्कालीन आयुक्तांचीही पुरवठा आदेशावर स्वाक्षरी झाली आहे.

या संशयास्पद प्रकाराविरोधात नाशिकच्या याचिकाकर्त्याने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली असून न्यायालयाने पुढील निर्णय होईपर्यंत संबंधित पुरवठादाराचे देयक अदा न करण्याचा आदेश दिला आहे.

याप्रकरणी प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश सरकारला देऊनही ते मुदतीत सादर न केल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत १० हजारांचा दंडही ठोठावला आहे. राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना आदिवासी विकास विभागामार्फत गणवेश साहित्य, नाइट ड्रेस पुरवले जातात. हा व्यवहार १०० कोटींहून अधिकचा असल्याने त्यासाठी विहित प्रक्रिया राबवून निविदा मागवणे गरजेचे होते. १ कोटीपेक्षा कमी रकमेची खरेदीच केवळ दर करारावर करता येईल, असे अनेक मुद्दे खडसे यांनी सभागृहात मांडले.

# कुणाल कामराला दुसऱ्यांदा समन्स

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ :**



स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराने एका गाण्यातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव न घेता टिप्पणी करत त्यांचा गद्दार असा उल्लेख केला होता. याप्रकरणी त्याच्यावर पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. तसेच त्याला चौकशीला बोलावण्यासाठी समन्स बजावण्यात आले होते. मात्र, तो चौकशीसाठी हजर न राहिल्याने त्याला आता पुन्हा एकदा समन्स बजावण्यात आले आहे.

कुणाल कामराचा 23 मार्च रोजी एक व्हिडिओ समोर आला होता या व्हिडिओत तो एक विडंबनात्मक गाणे गात आहे. त्याची पहिली ओळ आहे 'ठाणे की रिक्शा चेहरे पर दाढ़ी, आंखों पर चश्मा हाय....'. या गाण्यातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका करण्यात आली होती. या गाण्यानंतर मोठा वाद झाल्याचे पाहायला मिळाले. शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी कुणाल कामराच्या स्टुडिओची देखील तोडफोड केली होती. या गाण्याप्रकरणी कुणालवर एफआयआर देखील दाखल करण्यात आला.

कुणालवर एफआयआर दाखल झाल्यानंतर खार पोलिसांनी त्याला समन्स पाठवला होता. यामध्ये त्याला मंगळवारी सकाळी तपास अधिकाऱ्यांसमोर हजर राहण्यास सांगण्यात आले होते. मात्र, तो हजर झाला नाही. त्याच्या वकिलाने सात दिवसांची वेळ देण्याची विनंती केली होती. मात्र पोलिसांनी ही विनंती नाकारली. त्यानंतर आता पोलिसांनी कुणाल कामराला दुसरे समन्स पाठवले असून चौकशीसाठी हजर राहण्यास सांगितले आहे. दरम्यान मुंबई पोलिसांनी या प्रकरणात हॅबिटट स्टुडिओ तसेच या शोशी संबंधित असलेले इतर लोक यांनाही चौकशीसाठी समन्स बजावले आहे.

दुसरीकडे, कुणाल कामरा आणि ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांच्याविरोधात विधिमंडळात हक्कभंग प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. आमदार प्रविण दरेकर यांनी दोघांविरोधात हक्कभंग प्रस्ताव दाखल केला. अंधारे यांची खालच्या पातळीवरील भाषा आणि कुणाल कामरा याने एकनाथ शिंदे यांच्याबाबत केलेली खालच्या पातळीवरील टीका, यामुळे या दोघांविरोधात मी सभागृहात हक्कभंग प्रस्ताव मांडत आहे, असे प्रविण दरेकर म्हणाले.

# शिवाजी नाट्य मंदिरकडून छत्रपतींचा एकेरी उल्लेख बंद

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ :**

दादर परिसरातील सुप्रसिद्ध शिवाजी नाट्य मंदिराचे नाव आता श्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्यमंदिर असे करण्यात आले आहे.

आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा या नाट्यगृहाच्या नावामुळे एकेरी उल्लेख होत असल्याच्या मुद्द्यावरून सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार रवींद्र जाधव कोतापकर यांनी गेल्या काही वर्षांपासून पाठपुरावा सुरू केला होता. त्यांच्या अथक प्रयत्नांना यश आले असून, शिवजयंतीच्या मुहूर्तावर नाट्यगृहाच्या नावात हा सन्मानजनक बदल करण्यात आला आहे.

श्री छत्रपती शिवाजी स्मारक मंडळ ट्रस्ट मुंबई या संस्थेची स्थापना ३१ डिसेंबर १९४३ रोजी झाली होती. या ट्रस्टद्वारे दादर पश्चिम येथे शिवाजी नाट्य मंदिराची उभारणी करण्यात आली. या नाट्यगृहाच्या नावामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख होत असल्याची बाब अनेक वर्षे कोणाच्याही लक्षात आली नव्हती.

नाट्यगृहाचे अलीकडेच नूतनीकरण करण्यात आले आणि ते पुन्हा सुरू करण्यात आले. परंतु, त्याचे नाव पूर्वीप्रमाणेच शिवाजी नाट्य मंदिर असेच ठेवण्यात आले होते. यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख होत असल्याचे लक्षात आल्यानंतर कोतापूर गावचे सुपुत्र पत्रकार रवींद्र बाबाजी जाधव (रवि कोतापकर) आणि त्यांचे मित्र दीपक घेवदे यांनी याबाबत आवाज उठवला.

अखेर या नाट्यगृहाच्या नावात बदल करण्यात आल्याचे ट्रस्टने कळविले आहे.

# नहीं आता मेरे को मराठी, क्या करेगा?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**

परप्रांतीयांकडून महाराष्ट्रात राहून मराठी बोलण्यास नकार दिला जात असल्याचे अनेक प्रकरणे समोर आली आहेत. त्यातच आता वसोर्वातील डी मार्टमधील एका हिंदी कर्मचाऱ्याची अरेरावी पाहायला मिळाली.

मै मराठी मे नहीं हिंदी में बात करूंगा, नहीं आता मेरे को मराठी, क्या करेगा? असे उर्मटपणे म्हटले. मात्र, मनसेच्या कार्यकर्त्यांकडून फटके मिळाल्यानंतर तो कर्मचारी ठिकाणावर आला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एक ग्राहक अंधेरी पश्चिमेकडील वसोर्वा येथील डी मार्ट मध्ये सामान खरेदी करण्यासाठी गेला होता. यावेळी संबंधित हिंदी कर्मचारी आणि ग्राहकामध्ये वाद झाला. यावेळी ग्राहकाने त्या कर्मचाऱ्याला मराठीत बोलण्याची विनंती केली. मात्र, त्याने मराठीत बोलण्यास नकार देत, मी मराठी बोलणार नाही, हिंदीतच बोलणार, असे उद्धटपणे म्हणाला. तसेच नहीं आता मेरे को मराठी, क्या करेगा? , असे हिंदीत ग्राहकाला अरेरावीपणे म्हटले.



हिंदी कर्मचाऱ्याचा ज्या ग्राहकासोबत वाद झाला तो मनसेचा पदाधिकारी होता. सदर ग्राहकाने हा प्रकार इतर पदाधिकाऱ्यांना सांगितला. त्यानंतर वर्सोव्याचे मनसे विभाग अध्यक्ष संदेश देसाई यांच्या नेतृत्वाखाली मनसैनिकांनी अंधेरीतील डीमार्टमध्ये दाखल झाले. यावेळी सुरुवातीला मनसेचे कार्यकर्त्यांनी हिंदी कर्मचाऱ्याला सरळ भाषेत समजावत माफी मागण्यास सांगितले. परंतु, तरीही तो कर्मचारी माफी मागण्यास तयार नव्हता.

हिंदी कर्मचाऱ्याने माफी न मागितल्यामुळे मनसेच्या कार्यकर्त्यांनी त्याला मनसे स्टाईलने धडा शिकवला. प्रकरण चिघळत गेल्याचे लक्षात येताच त्या कर्मचाऱ्याने दोन्ही कान पकडून माफी मागितली.

# ॐ नमो भगवते वासुदेवाय नमः

(२६ मार्च : स्मार्त-भागवत एकादशी)

वारकरी संप्रादयामध्ये एकादशीचे व्रत अगदी भक्तीभावाने ठेवले जाते. या दिवशी भगवान विष्णुंची पूजा केली जाते. प्रत्येक चांद्रमासातील शुक्ल व कृष्ण पक्षातील ११व्या तिथीला एकादशी म्हटले जाते.

या दिवशी विष्णुभक्त तसेच विठ्ठलभक्त उपवास करतात. एकादशीच्या दुसऱ्या दिवशी उपवास सोडला जातो. स्मार्त आणि भागवत एकादशी असे दोन भेद सांगितले आहे. ज्या पक्षात हे दोन भेद येतात. त्यावेळी पंचांगात पहिल्या दिवशी स्मार्त व दुसऱ्या दिवशी भागवत, असे लिहिलेले असते. अनेकदा एका पक्षात स्मार्त आणि भागवत, अशा एका पाठोपाठ दोन एकादशी असतात. यातील पहिल्या येणाऱ्या एकादशीला स्मार्त नाव असते. परंतु, भागवत एकादशीला नाव नसते.

पूजाविधी- वारकरी संप्रादयामध्ये परंपरेने भागवत एकादशी साजरी केली जाते. या एकादशीच्या दिवशी भगवान विष्णुंची पूजा करून विष्णू भक्त दिवसभर उपवास करतात. भागवत एकादशी व्रत हे पूर्ण नियम, श्रद्धा व विश्वासाने केले जाते. या व्रताच्या प्रभावामुळे मोक्ष प्राप्ती होते. या व्रतामुळे अश्वमेध यज्ञ, घोर तपस्या, तीर्थ स्नान व दान या सर्वांपासून मिळणाऱ्या पुण्यापेक्षाही जास्त पुण्य मिळते, असे पौराणिक कथेत म्हटले आहे.

महत्त्व- वारकरी संप्रदायामध्ये एकादशीच्या व्रताला विशेष महत्त्व आहे. प्रत्येक मासात २ याप्रमाणे वर्षामध्ये २४ एकादशी येतात. यातील चैत्रापासून फाल्गुन मासातील शुक्ल पक्षात कामदा, मोहिनी, निर्जला, शयनी, पुत्रदा, परिवर्तिनी, पाशांकुशा, प्रबोधिनी, मोक्षदा, प्रजावर्धिनी, जयदा आणि आमलकी यांचा समावेश होतो. याशिवाय कृष्ण पक्षात पापमोचनी, वरुधिनी, अपरा, योगिनी, कामिका, अजा, इंदिरा, रमा, फलदा, सफला, षट्?तिला व विजया या एकादशींचा समावेश होतो. पौराणिक कथेनुसार एकादशीच्या दिवशी सर्व पापे अन्नाचा आश्रय करून राहतात. म्हणून जो मनुष्य एकादशीच्या दिवशी अन्न भक्षण करतो त्याला ती पापे लागतात. म्हणून एकादशीला उपवास केला जातो. या दिवशी दान केल्यास भगवान विष्णू प्रसन्न होतात.

विष्णुभक्तांसाठी एकादशी हे व्रत म्हणजे एक पर्वणीच असते. त्यामुळे ते नेमाने सर्व एकादशी करतात. ज्यांना उपास करणे शक्य नसते, ते भगवान विष्णूची पूजा करतात. तसेच साधा सात्त्विक आहार घेतात. ॐ नमो भगवते वासुदेवाय नमः या मंत्राचा जप करतात. अथवा विष्णुसहस्त्रनामाचे श्रवण-पठण करतात.

मात्र जेव्हा एखादी तिथी विभागून येते आणि दिनदर्शिकेत दोन दिवसांवर एकाच तिथीचा दोनदा उल्लेख येतो तेव्हा काही भाविकांचा गोंधळ होतो. जसे की स्मार्त आणि भागवत एकादशी! मागील ९ डिसेंबर रोजी आलेल्या उत्पत्ती एकादशीला ही आणखी दोन नावे का? हा प्रश्न तुम्हालाही पडला असेल.

**उत्पत्ती एकादशीः** सर्व व्रतांमध्ये एकादशीच्या व्रताचे विशेष महत्त्व आहे. असे मानले जाते की या व्रताच्या प्रभावाने वर्तमानासह मागील जन्माची पापे नष्ट होतात. यासोबतच अनेक पिढ्यांतील पितरांना मोक्ष प्राप्त होतो. ज्यांना एकादशीचा उपवास सुरू करायचा आहे ते उत्पत्ती एकादशीपासून हे व्रत सुरु करू शकतात.

या एकादशीच्या तिथीला देवीचा जन्म झाला म्हणून तिला उत्पन्ना तसेच उत्पत्ती एकादशी असेही म्हणतात. मग स्मार्त एकादशी म्हणजे काय? तर दशमी संपून एकादशी सुरू होताना त्या तिथीने सूर्योदय पाहिला नाही पण तो दिवस नव्या तिथीच्या नावे सुरू झाला असेल तर त्याला स्मार्त तसेच दर्श असा उल्लेख केला जातो. म्हणजे तिथी सुरू झाली पण तिथीशी संबंधित व्रत सूर्योदय पाहिलेल्या दिवशीच करायचे यासंबंधी ती सूचना असते. म्हणून ती स्मार्त एकादशी!

**भागवत एकादशीः** जी तिथी सूर्योदय पाहते ती तिथी आपल्याकडे ग्राह्य धरली जाते. म्हणजेच एकादशी तिथी आदल्या दिवशी सुरू झालेली असली तरी तिने जर दुसऱ्या दिवशीचा सूर्योदय पाहिला असेल तर ती तिथी पाळली जाते आणि दिनदर्शिकेवर देखील सूर्योदय पाहिलेल्या तिथीवर भागवत धर्माचे ध्वजचिन्ह दिसून येते. भागवत धर्म पाळणारे वारकरी बांधव त्यालाच भागवत एकादशी म्हणतात. वैष्णव उदय तिथी मानतात. स्मार्त वाले जिथून तिथी सुरू झाली ती तिथी मानतात आणि व्रत सुरु करतात. हा तो फरक.

स्मार्त म्हणजे जे लोक वेंदांवर, श्रुती स्मृती, पुराण यांना प्रमाण मानतात, ज्यांना वैदिक धमार्चं ज्ञान आहे, ते स्मार्त एकादशी पाळतात. थोडक्यात ऋषी, मुनी तसेच कर्मकांड करणारे योगी स्मार्त एकादशी करतात. तर वैष्णव म्हणजे जे विष्णू भक्त आहेत, संसारी आहेत, जे सूर्योदय पाहणारी तिथी ग्राह्य धरतात ते भागवत एकादशीचे व्रत करतात. म्हणून विष्णू भक्तांनी स्मार्त एकादशीला विष्णू पूजा करावी मात्र एकादशी व्रताचे पालन भागवत एकादशीला करावे, असे शास्त्र सांगते.

भगवान विष्णूंना प्रसन्न करण्यासाठी भागवत एकादशी व्रत केले जाते. वारकरी संप्रादयामध्ये एकादशीचे व्रत अगदी भक्तीभावाने ठेवले जाते. या दिवशी भगवान विष्णुंची पूजा केली जाते. प्रत्येक चांद्रमासातील शुक्ल व कृष्ण पक्षातील ११व्या तिथीला एकादशी म्हटले जाते.

या दिवशी विष्णुभक्त तसेच विठ्ठलभक्त उपवास करतात. एकादशीच्या दुसऱ्या दिवशी उपवास सोडला जातो. एकादशीच्या व्रताला विशेष महत्त्व आहे. प्रत्येक मासात २ याप्रमाणे वर्षामध्ये २४ एकादशी येतात. यातील चैत्रापासून फाल्गुन मासातील शुक्ल पक्षात कामदा, मोहिनी, निर्जला, शयनी, पुत्रदा, परिवर्तिनी, पाशांकुशा, प्रबोधिनी, मोक्षदा, प्रजावर्धिनी, जयदा व आमलकी यांचा समावेश होतो.

याशिवाय कृष्ण पक्षात पापमोचनी, वरुधिनी, अपरा, योगिनी, कामिका, अजा, इंदिरा, रमा, फलदा, सफला, षट्तिला व विजया या एकादशींचा समावेश होतो. पौराणिक कथेनुसार एकादशीच्या दिवशी सर्व पापे अन्नाचा आश्रय करून राहतात. म्हणून जो मनुष्य एकादशीच्या दिवशी अन्न भक्षण करतो त्याला ती पापे लागतात. म्हणून एकादशीला उपवास केला जातो. या दिवशी दान केल्यास भगवान विष्णू प्रसन्न होतात. अशी मान्यता आहे.

--------------------

**कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे**
**गडचिरोली.**
**9423714883**

■ ■ ■

# श्री क्षेत्र सावंगा विठोबा येथे भक्तांची मांदियाळी

तीर्थयात्रेला कशाला जाऊ,
को?्या अक्षदा फुल कुठे वाहू,
तुझ्या चरणी प्रेम सुखाची वाणी,
अमृत संजीवनी.

कृष्णाजींनी काढली शाळा,
नाही पाटी पुस्तक फळा
अवघे गोपाळ केले गोळा,
देवा शिकवा आम्हाला चतुरपतीचा धडा

अमरावती जिल्ह्यातील श्री क्षेत्र सावंगा विठोबा येथे परमपूज्य कृष्णाजी महाराजांनी 350-400 वर्षांपूर्वी जे सांगितले तेच आज घडत आहे. विज्ञान जिथे अज्ञान झाले तेथून कृष्णाजी महाराजांचे वाङमय सुरू झाले. निर्गुण, निराकार, निष्कलंकी या अवताराने ४५ वर्ष भक्ती करून स्वतः अवधूत रुपी होऊन अवधूत संप्रदायाची मुहूर्तमेढ रोवली.

४५ वर्षे वाणी सांगितली जगा,
भाव नाही पोटी दोहीत मानेना कदा
हीच ती चतुरपती वाणी होय

कृष्णाजी महाराजांच्या मुखातून जे ज्ञान निघत होते ते त्यांचे सहकारी म्हणजे सावंग्याचे पुनाजी, संतू, चिंतू महाराज, मालखेडचे इसनाजी (ईश्वर) महाराज, कारल्याचे राघोबाजी महाराज, जळगावचे हेंगळोजी महाराज यांनी ओवीबद्ध करून गायन केले, अवधूत महाराजांनी जे सांगितले ते आज अगदी तंतोतंत घडत आहे आपण विचारही करू शकत नाही आणि सत्य लपवूही शकत नाही इतका अफाट ज्ञानाचा भांडार महाराजांच्या भजनात आहे.

फार फार दादा एक वायू सुटन,
पहाड पर्वत उडून जाईन मेरू शिखर,
मोठे मोठे वृक्ष दादा गगनी फिरतीन

वायू सुटला त्या वायुने बळी गेले, पहाड पर्वत जमीन दोस्त झालेली आहे अशी ही महाराजांची भविष्यवाणी आज खरी ठरली आहे. केवळ महाराष्ट्रच नव्हे तर आंध्रप्रदेश, कर्नाटक, मध्यप्रदेश, राजस्थान, गुजरात या राज्यातील भाविक देखील येथे दर्शनाला येतात .

कृष्णाजी महाराजांचे समाधी स्थळ असल्याने येथे वर्षभर भाविकांची रेलचेल पाहायला मिळते या ठिकाणी लाखो भाविक, हजारो मनोरुग्ण, अनेक दुखी रोगी येतात महाराजांचे चरणी विश्वासपूर्वक श्रद्धा ठेवून अरज लावतात आणि आपल्या दुःखापासून मुक्ती मिळवतात. महाराजांची वाणी ही वर्तमान, भूत व भविष्य काळाची असून त्रिकालबाधीत सत्य आहे.

मूळ स्तंभाचा शकुन आला चौथ्या खुम्भी
सत्य वचन दौंडी देल्ली धन्याची वाणी
पुढे होणार तेच कथन लटक नका मानू कुणी
वचन दिले मानवाले,
मानवाची देवा करुणा तुले

कृष्णाजी महाराजांची भजने हे मर्यादित स्वरूपाचे नसून महाराजांनी ४५ वर्ष वाणी सांगितली आहे,महाराजांचे भजन हे पृथ्वीवर घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीवर आधारित आहे




**जसे राजकीय :**
खंडो खंडीचे राज्य
भांडतील आपल्या राज्याला,
ग्रंथासारखे जप तप ढळले
आता पुसाव ते कुणाला
आर्थिक :
राजकीय मध्ये तूट पडणं पैशाची हे नुपुर
अतिरती शाहू सावकार लुटल्या जातील हे फार
सामाजिक : ब्राह्मण क्षेत्री वैश्य शूद्र
एकच वर्ण होईल बा
कौटुंबिक : रूत हे गमन करतीन दोघेजण,
बंधनावाचून साच्या नाही
त्याचप्रमाणे महाराजांनी तरणोपाय देखील सांगितला आहे.
तरुणोपाय होईल गडे हो टीका हो नामा ले
ज्याचा प्राणी तोच तारण पहा दिवसाले

महाराजांचे भजन म्हणजे सत्यवाणी नामात किती शक्ती आहे ते येथील भाविकांची संख्या आपल्याला सांगून जाते वर्षभरात येथे गुढीपाडवा आणि दसरा अशी दोनदा यात्रा भरते यातील गुढीपाडवा ते रामनवमी दरम्यान भरणाऱ्या यात्रेला विशेष महत्व असून १२०० लोकसंख्या असलेल्या या सावंगा गावात तब्बल ८ ते १० लाख भाविक यात्रेवेळी दर्शनाला येतात.

महाराजांना विनवणी कापूर जाळून करतात तर यावेळी लाखों भाविक करोडो रुपयांचा कापूर जाळतात म्हणुनच ही यात्रा कापुराची यात्रा म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहे. या दोन्हीही सणाला येथे असणारे ७२ फूट उंच असलेले झेंडे जे देव भक्ताचे प्रतीक आहेत. त्याला खोळ चढवली जाते. जुनी खोळ काढून नविन चढविण्याचे या चित्तथरारक दृष्याला टिपण्यासाठी लाखों भाविक हजर असतात.

तर संस्थानचे विश्वस्त असलेले चरणदास कांडलकर महाराज हे झेंडे चढवीत असतात तर वर्षातून दोन वेळा होणाऱ्या या यात्रे व्यतिरिक्त ४ सव्वा महिन्याच्या मांडी (भजन) असतात ज्या निरंतर असतात.

शिवाय प्रत्येक अमावस्येला चंदन उटी हा कार्यक्रम असतो यावेळी देखील भाविकांची गर्दी येथे पाहवयास मिळते.

१९९५ मध्ये हे संस्थान श्री विठोबा संस्थान ऊर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान ट्रस्टच्या देखरेखीत प्रगती करत असून, पुंजाराम वै. नेमाडे (गुरुजी) हे अध्यक्ष आहेत. उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोकराव सोनवाल सर्व विश्वस्त विनायकराव पाटील, वामनराव रामटेके, गोविंदराव राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्नील चौधरी इत्यादी पदाधिकारी संस्थानचे काम पाहत आहेत.

संस्थान अंतर्गत प्रसादालय जेथे रोज अन्नदान केल्या जाते शिवाय गौरक्षण असून बाहेरगावातून येणाऱ्या भाविकांसाठी भक्तनिवास आहे, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था देखील संस्थानने केली आहे. भाविकांच्या आगमनासाठी सावंगा सज्ज होवू लागले आहे.

**रवि कलाने**
**मालखेड.**

■ ■ ■

# बालविवाह थांबविण्यात ‘ॲक्सेस टु जस्टीस’ला यश

**अकोला** : चान्नी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावात होऊ घातलेला बालविवाह वेळीच रोखण्यात ‘ॲक्सेस टु जस्टिस’ प्रकल्पाच्या कार्यकर्त्यांना यश मिळाले. चान्नीलगतच्या गावात बालविवाह होणार असल्याची गोपनीय माहिती प्राप्त होताच ‘ॲक्सेस टु जस्टिस’ प्रकल्प, आयएसडब्ल्यूएस पथकाने बालिकेच्या घरी भेट दिली. मुलीचे वडील ४ वर्षांपूर्वी मरण पावले असून आईने दुसरे लग्न केल्याने पालनपोषण आजी करत होती. आजीने तशी माहिती पथकाला दिली. घरची आर्थिक स्थिती हलाखीची असल्याने, तसेच आजीला दुस-या कुणाचा आधार नसल्याने मुलीचे लग्न करण्याचा विचार केला होता, असे आजींनी पथकाला सांगितले.त्यावेळी पथकाच्या सदस्यांनी आजींची समजूत काढली व बालविवाह प्रतिबंधक कायद्याची माहीती दिली. मुलीचे वय १८ वर्ष पुर्ण झाल्याशिवाय मुलींचे लग्न करता येत नाही, असे सांगितले व मुलीला बालकल्याण समितीसमक्ष सादर करण्यात आले.बालकल्याण समितीने मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण झाल्याशिवाय मुलींचे लग्न न करण्याबाबतचे हमीपत्र लिहून घेतले. त्यावेळी ग्रामविकास अधिकारी, सरपंच, पोलीस पाटील, पोलीस यांची साक्ष घेण्यात आली. हा बालविवाह थांबविण्यासाठी बालकल्याण समिती, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी यांचे मार्गदर्शन लाभले, संस्थेचे जिल्हा प्रकल्प समन्वयक शंकर वाघमारे, समन्वयक सपना गजभिये, विशाल गजभिये, कम्युनिटी सोशल वर्कर पूजा पवार, ग्रामविकास अधिकारी, पोलीस पाटील यांनी मोलाचे कार्य केले.

# तालुका स्तरावर निर्माण होणार अद्ययावत क्रीडा संकुल

## प्रत्येक तालुका क्रीडा संकुलासाठी तीन कोटींच्या प्रस्तावाला मान्यता पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांचा पुढाकार



**▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी)**

जिल्ह्यातील प्रत्येक तालुका क्रीडा संकुलासाठी प्रत्येकी ३ कोटी रू निधीच्या प्रस्तावाला राज्य क्रीडा विकास समितीने मान्यता दिली आहे. जिल्ह्यातील तालुका क्रीडा संकुलांचा अनुशेष दूर व्हावा यासाठी राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी पुढाकार घेऊन क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे पत्रान्वये निधीची मागणी केली.

ती पूर्ण झाल्याने आता तालुक्यातील खेळाडू, क्रीडाप्रेमींना हक्काचे आणि विविध अद्ययावत सुविधांनी युक्त क्रीडांगण उपलब्ध होणार आहे.अकोला जिल्ह्यातील तेल्हारा, अकोट, मूर्तिजापूर, बार्शीटाकळी, पातूर, बाळापूर येथे तालुका क्रीडा संकुलांच्या विकासासाठी प्रत्येकी ३ कोटी निधी मिळण्यासाठी व याबाबतचा अनुशेष दूर होण्यासाठी पालकमंत्री ॲड. फुंडकर यांनी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे पत्रान्वये मागणी केली.त्यानुसार राज्य क्रीडा विकास समितीच्या माध्यमातून या निधीच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे.

जिल्ह्यात इनडोअर व आऊटडोअर क्रीडा प्रकारांमध्ये अनेक खेळाडूंची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. क्रीडा संकुलांसाठी निधी मिळाल्याने ग्रामीण भागातील उदयोन्मुख खेळाडूंना हक्काचे स्टेडियम मिळणार आहे. याद्वारे जिल्ह्यात खेळांना पोषक असे वातावरण तयार होईल, असा विश्वास पालकमंत्री ॲड.फुंडकर यांनी व्यक्त केला. जिल्ह्यातील खेळाडू, क्रीडा प्रशिक्षक व क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांची मागणी पूर्ण झाल्याने क्रीडा क्षेत्रात आनंद व्यक्त होत आहे.

# मळ्यातील ऊस पेटवून देणाऱ्या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**▪तेल्हारा,दि २६ (प्रतिनिधी)**

तेल्हारा तालुक्यातील खापरखेड फाट्यावरील फिर्यादीच्या मालकीच्या मळ्यातील ऊस खापरखेड येथील एका इसमाने पेटवून देऊन ३ लाख ३० हजार रुपयाचे नुकसान केल्याची घटना मंगळवार दि .२५ मार्च २०२५ रोजी सकाळी १० ते १०.३० वाजेदरम्यान घडली.

याप्रकरणी आरोपी विरुद्ध तेल्हारा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी गणेश रामदास ओंकारे (५५) राहणार खापरखेड ता. तेल्हारा या शेतकऱ्याचे खापरखेड फाट्यावर शेत असून सदर मळ्यात ऊस पेरला. ३ एकर शेती पैकी एका एकरात ऊस पेरलेला आहे. मळ्यासमोर खापरखेड फाट्यावर बस थांबा असून तेथे निवारा बांधलेला आहे. निवाऱ्यात गावातील रघुनाथ विश्वनाथ वानखडे याने अतिक्रमण केले आहे. सदर व्यक्तीने ऊस पेटवून देण्याची धमकी दिली होती .पूर्वी फिर्यादीशी त्याचे भांडण झाले होते. त्याबाबत त्यावेळी तेल्हारा पोस्टे मध्ये तक्रार नोंदविण्यात आली होती. घटनेच्या दिवशी दि.२५रोजी फिर्यादीच्या अजय नामक मुलास सदर मळ्यात धूर दिसला तेव्हा फिर्यादीची पत्नी व मुलगा मळ्याकडे गेले व आग विझविण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

दरम्यान तेल्हारा येथून अग्निशामक दलाचे कर्मचारी पोहोचले व त्यांनी आग आटोक्यात आणली. फिर्यादीचे नुकसान व्हावे या उद्देशाने आरोपी नामे रघुनाथ विश्वनाथ वानखडे राहणार खापरखेड तालुका तेल्हारा याने आग लावली असा फिर्यादीने तक्रार अर्जातून आरोप केला आहे.

तक्रारीच्या आधारे तेल्हारा पोलिसांनी घटनेच्या दिवशी दुपारी ४.३० वाजेनंतर नमूद आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बी एन एस) २०२३ चे कलम ३२६ अन्वये गुन्हा दाखल केला.

# शिरसोत युवकाची नृशंस हत्या

## आठ दिवसात तीन खून

**▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी)**

अनैतिक संबंधाच्या संशयावरून झालेल्या वादात काही युवकांनी मूर्तिजापूर तालुक्यातील शिरसो येथील सुरज चंद्र भोसले (१९ ) याची कुऱ्हाडीने वार करून नृशंस हत्या केली. ही घटना मंगळवारी सकाळी ७ वाजता घडली. या घटनेत झालेल्या हल्ल्यात सुरजचे ३ कुटुंबीय सदस्य देखील जखमी झाले आहेत. पोलिसांनी याप्रकरणी चार आरोपींना अटक केली आहे. गेल्या आठ दिवसात अकोला जिल्ह्यात लागोपाठ वेगवेगळ्या घटनेत तीन युवकांचा खून झाला आहे. जिल्ह्यात पोलिसींग नसल्याने गुन्हेगारी वाढली असून गुन्हेगारांना पोलिसांचा धाक राहिलेला नाही. विशेष म्हणजे एका पाठोपाठ तीन युवकांचे खून होत असताना देखील अकोल्यातील लोकप्रतिनिधी चुप्पी साधून असल्याने अकोलेकर भयभीत मूर्तिजापूर झाले आहेत. तालुक्यातील ग्राम शिरसो येथे पारध्यांची वसाहत आहे. एकमेकांचे नातेवाईक असलेल्या या पारधी वसाहतीत अनैतिक संबंधावरून वाद सुरू होता. त्याचे पर्यावसान मंगळवारी हाणामारी आणि त्यानंतर खुनात झालेत. कुऱ्हाडीच्या हल्ल्यात १९ वर्षीय सुरज भोसले यांचा मृत्यू झाला. त्याचे आई-वडील जखमी झाले आहेत. अकोला मूर्तिजापूर जिल्ह्यातील तालुक्यातील शिरसो गावात जुन्या वादाने रक्तरंजित वळण घेतले. चुलत कुटुंबातील या हिंसक वादात १९ वर्षीय सूरज भोसले याचा दुदैवी मृत्यू झाला. ही घटना इतकी भीषण होती की, सुरजच्या डोक्यावर कुऱ्हाडीने वार करण्यात आले, त्यामुळे तो गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाला. या हल्ल्यात सुरजचे वडील आणि भाऊही गंभीर जखमी झाले आहेत. दोघांनाही तात्काळ अकोल्याच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. या हाणामारीत दोन्ही बाजूंनी एकमेकांवर आणि काठ्यांनी हल्ला केला, याचे काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. दोन कुटुंबांमधील हाणामारी किती प्रमाणात वाढली होती, या घटनेची भीषणता या व्हिडिओतून स्पष्टपणे दिसून येते. हा विषय इतका गंभीर झाला की एका तरुणाचा जीव गेला आणि संपूर्ण गावात दहशत पसरली. या घटनेबाबत स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.घटनेची माहिती मिळताच मूर्तिजापूर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला.

# माझोड ते तांदळी गावापर्यंतचा रस्त्याची दुर्दशा

**▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी)**



अकोल्यापासुन मोठ्या हायवे आणि शहरांना जोडणारा हा अतिशय शॉर्टकट रस्ता समजल्या जायचा, परंतु ज्यांना या रस्त्याची दुर्दशा माहीत आहे ते ८-१० किलोमीटर चा फेरा मारून स्वगृही परततात, आणि ज्यांना या रस्त्याची दुर्दशा माहीती नसताना प्रवास करतात ते अक्षरशः संबंधित लोकांना / अधिकार्यांना शिव्या देत जातात. गावालगतचा रस्ता एवढा खराब आहे म्हटल्यावर लांब पल्याची प्रवास करणारी लोकं पण आवाज उठवित नाहीत असा विचार करुन माझोड, तांदळी, बाभुळगाव या गाववाल्यांची अक्षरशा लाज काढुन जातात. पण आवाज उठवुन सुद्धा मुस्कटदाबी होत असताना आपण सांगावं कोणाला इथं गाववाल्यांना प्रश्न पडतो. अकोला शहरातुन आपल्या परीवाराच्या पोटासाठी कित्येक कामगार व व्यावसायिक रात्रि १२ वाजेनंतरही प्रवास करतात आणि जिव धोक्यात घालतात. यावर संबंधित वरीष्ठ अधिकारी, पदाधिकारी यांनी लक्ष वेधुन या रस्त्याचा प्रश्न लवकर मार्गी लावावा अशी लोकांची अपेक्षा आहे. या संबंधित सर्व यंत्रणा लवकर मार्गी लागावी अशी गाववाल्यांना अपेक्षा आहे.

# शिवसैनिकांचा आक्रमक यल्गार

## निंदनीय कवितेवर कामराविरोधात कारवाईची मागणी

**▪मुर्तिजापुर,दि २६ (प्रतिनिधी)**



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविषयी विनोदवीर कुणाल कामरा यांनी निंदनीय कविता गायल्याचा आरोप करत शिवसेनेने आपल्या नेहमीच्या आक्रमक शिवसेना स्टाईलमध्ये त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात शिवसेना तालुका प्रमुख दीपक पाटील दांदळे यांनी २६ मार्च २०२५ रोजी मुर्तिजापूर शहर पोलिस ठाण्यात उपनिरीक्षक आशिष शिंदे यांना लेखी निवेदन सादर केले.

शिवसेनेने स्पष्ट इशारा दिला आहे की, जर कामरा यांच्यावर तातडीने गुन्हा दाखल करण्यात आला नाही, तर शिवसैनिक आपल्या थाटात रस्त्यावर उतरतील आणि तीव्र आंदोलन करतील. कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर असेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.शिवसैनिकांनी यावेळी शिवसेना स्टाईलमध्ये रोष व्यक्त केला आणि कामरा यांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता ३५३ (१)(ब), ३५३ (२), आणि ३५६ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची जोरदार मागणी केली.शिवसेना तालुकाप्रमुख दीपक पाटील दांदळे, शहर प्रमुख गौरव अशोकराव मोरे, तसेच उपप्रमुख उमेश चिंते, मंगेश बाहेकर, विकास कुर्हेकर, प्रमोद सपकाळ, बाळू घोरमोडे, गोपाळ ठोकळ, सुधाकर गोपकर, निर्भय खरबडकर, मंगेश डांगे, सुशांत साठे, श्याम वाळस्कर, चेतन सोळंके, रवी शितोळे, श्याम काकडे, नंदकिशोर मालवे, आणि नकुल चव्हाण यांच्यासह शिवसेनेचे असंख्य पदाधिकारी आणि कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# आगर सर्कल मधील पाळोदी येथे शिवसेना शाखेचे उद्घाटन व पक्षप्रवेश



**▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी)**

शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना जिल्हाप्रमुख श्रीरंग दादा पिंजरकर त्यांच्या मार्गदर्शनाखाली काल आगार सर्कल मधील पाळोदी गाव तालुका अकोला येथे शिवसेना शाखेचे उदघाटन शिवसेना जिल्हा प्रमुख श्रीरंग पिंजरकर यांच्या हस्ते करण्यात आले, या कार्यक्रमात अनेक गावकऱ्यांनी व युवकांनी शिवसेना मुख्य नेते एकनाथ जी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वा त प्रवेश केले.

शिवसेना हा नुसता पक्ष नसून ही एक बाळासाहेब ठाकरे यांनी संघटना तयार केली आहे जी हिंदू धर्मातील नागरिकांवर व आपल्या आई बहिणीवर कुठे अन्याय अत्याचार होत असल्यास त्या विरुद्ध उठाव करणारी संघटना आहे. पुढे मार्गदर्शन करताना आगर, पाळोदी हे गावे अकोला जिल्ह्यातील जवळ असले तरी येथील स्थानिक पदाधिकाऱ्याच्या नाकर्ते पणा मुळे या गावाला येणाऱ्या रस्त्यांची दयनीय व वाईट अवस्था आहे या कार्यकर्माला निवासी उपजिल्हा प्रमुख संतोष अनासने, उपजिल्हा प्रमुख गोपाल म्हैसने, तालुका प्रमुख विजय वानखडे जिल्हा सचिव सतीश गोपनारायण उपशहर प्रमुख स्वप्नील देशमुख हजर होते या कार्यकर्माचे आयोजन उपतालुका प्रमुख सागर अवारे सर्कल प्रमुख महादेव ठाकरे, शाखा प्रमुख तेजराव वक्टे,उप शाखा प्रमुख अमोल वक्टे यांनी केले या कार्यकर्माचे संचालन शहर संघटक राजेश पिंजरकर यांनी केले.या वेळीस सुखदेव चांदुरकर शिवहरी ढोले विनय डाबेराव निवृत्ती वक्टे विनोद लोरवार आर्यन वक्टे माधव तराडे अमित तराळे प्रतीक वक्टे निवृत्ती वक्टे दिगंबर वक्टे शिवहरी वक्टे विलास वक्टे शुभम तराळे शंकर वक्टे अनिल वक्टे जयश वक्टे गोपाल तराळे नंदकिशोर वक्टे शिवा वक्टे विलास वक्टे संतोष नांदुरकर गोपाल नांदुरकर उज्वल चितोळे मंगेश जाधव जयसिंग ठाकूर आकाश वक्टे यांच्यसह अनेक युवकांनी शिवसेने मध्ये प्रवेश केले.

# थोडक्यात

## ११ गोवंशाला मिळाले जीवदान



**अकोला** : रामदासपेठ पोलिसांनी केलेल्या एका कारवाईत कत्तलीसाठी आणलेल्या ११ गोवंशाला जीवदान मिळाले आहे. आज सकाळी मिळालेल्या माहितीच्या आधारावरुन मच्छि मार्केट रोड, कुरेशी समाज ऑफिस समोर नाकाबंदी केली असता एम. एच. ३६ एए ३०२५ क्रमांकाचा आयशर ट्रक येतांना दिसल्यावरुन त्याला थांबविल्यानंतर पाहणी केली असता आयशर गाडीत ११ गोवंश निर्दयतेने कत्तलीसाठी बांधुन अकोला येथे आणण्यात आले होते. या प्रकरणी ट्रक मालक श्रीकांत यादवराव चौधरी रा. नागतरोडी जि. नागपूर याचे विरुध्द महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायद्याच्या कलम ५, ५ (अ) ५ (ब) ९ सह कलम ११ व प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम सह कलम ११९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गोवंशाची रवानगी आदर्श गो सेवा प्रकल्प या ठिकाणी करण्यात आली आहे. सदरची कारवाई पोलिस निरिक्षक मनोज बहरे व त्यांचे सहकारी अंमलदार शे. हसन, दादाराव ठाकरे, अनिल भातखडे, श्याम मोहोळे, रोशन पटले यांनी केली आहे.

## प्रतीक्षा वानखडे चित्रकला स्पर्धेत प्रथम

**माझोड** : प्रतीक्षा प्रशिक वानखडे हीने चित्रकला रंगभरण स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. सदर स्पर्धा जिजाऊ बहुउद्देशिय सामाजिक शिक्षण व प्रशिक्षण संस्था अकोला यांच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत माऊंट कारमेल स्कूल बोरगाव मंजू ची विद्यार्थिनी प्रतीक्षा वानखडे हीने चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यामुळे संस्थेने तिचा ट्रॉफी व सन्मानपत्र देऊन सत्कार केला.

# दिव्यांग बांधवानी आपली डीबीटी तहसीलवर जाऊन करावी

**▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी)**

समस्त दिव्यांग बाधंवाना व संजय गाधी नीराधार योजना लाभार्थीना शासनाकडून व भाजपा दिव्यांग आघाडी कडून आव्हाहन करन्यात येत आहे की योजनेचे पैसै थेट लाभार्थीचे खात्यात जमा होने साठी शासनाकडून १०० टक्के डायरेक्ट बेनीफीट ट्रान्सफर (डी बी टी) योजना कॅम्पचे आयोजन जिल्ह्यातील प्रत्येक तहसीलवर लवकर होने करीता त्या त्या तालूक्यातील दिव्यांगानी व सगायोनेचे लाभार्थीनी लवकर करुन घ्यावे अन्यथा अनुदान मिळनार नाही त्यासाठी तात्काळ तहसीलवर जाऊन सोबत आपले आधारकार्ड मोबाईल लीक केलेले व ज्या बॅकेत तुमचे खात्यात पैसे मिळतात ते बॅकेचे पासबुक व ओटीपी येनार म्हनून आधारलींक मोबाईल सोबत न्यावा दहा मीनीटात तुमचे खांतेशी डीबीटी लिंक होनार यापुढे आता डायरेक्ट बेनीफेट ट्रान्सफर म्हनून पेशंन जमा होनार तरी लवकरात लवकर आपले डीबीटी सर्व दिव्यांगानी व सगायो लाभार्थीनी करून घ्यावे हि वींनती जिल्हा भाजपा दिव्यांग सेल कडुन सर्व जील्ह्यातील तमाम दिव्यांग बाधवाना विनंती करन्यात येत आहे

# रेशन कार्डला मुदतवाढ देण्यात यावी : विजय अग्रवाल

**▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी)**



रेशन कार्डच्या ची मुदत मुदत वाढ देण्यात यावी अशी मागणी भाजपा नेते विजय अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली भाजपा ने अन्नपुरवठा अधिकारी यांच्याकडे केली. रेशन कार्ड केवायसी करण्याची प्रक्रिया तू असून सुरू असून अनेक दिवसापासून सर्व डाऊन मशीन बंद असणे यामुळे अनेक नागरिक यापासून वंचित असून शासनाने ३१ मार्च ची मुदत वाढून ३१ जुलै पर्यत देण्यात यावी गेल्या तीन महिन्यापासून नोंदणी बंद असल्यामुळे अनेक नागरिक या योजनेपासून वंचित आहे शासनाच्या योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी केवायसी ची गरज असून यासंदर्भात सहानुभूती विचार करून महाराष्ट्र शासनाने निर्णय घ्यावा अशी मागणी विजय अग्रवाल यांनी केली भाजपा महानगर अध्यक्ष जयंत मसणे त्यांनी शहरातील मध्यमवर्गासाठी ही मुदत वाढ कशी आवश्यक आहे अशी आपल्या मागणी द्वारे अधिकाऱ्यांना सर्वसामान्यांचे मत मांडले यावेळी माधव मानकर, सजयगोटफोडे रमेश अल्लकरी, अमोल साबळे, किशोर कुचके विपुल घोगरे, प्रकाश श्री माळी, नितीन लांडे संतोष पांडे, निलेश निनोरे रमेश करीहार, कैलास रणपिसे नवीन जाधव नितीन राऊत टोनी जयराज, विकी ठाकूर बन्सी शाहू बन्सी ठाकूर, विठ्ठल देशमुख, प्रशांत अवचार, कृष्णा पांडे, वसंता मानकर, तुषार भिरड धनंजय धबाले बाळू सोनवणे, आम्रपाली उपरवट, चंदा शर्मा सुमनताई गावंडे, अर्चना चौधरी, निकिता देशमुख, डॉक्टर अमित कावरे, संजय जोशी नितीन ताकवले दिलीप नायसे , राजू नेरकर, साधना येवले वैशाली शेळके गीतांजली शेगोकार अनिल नाव का र, मिलिंद राऊत एडवोकेट नितीन गवळी गोपाल मुळे राजू वगारे, राजू धोटे आधी प्रामुख्याने यावेळी उपस्थित होते.

# ३१ वर्षानंतर पुन्हा भरली शाळा माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मिलन व कृतज्ञता सोहळा संपन्न

**▪अडगांव बु.,दि २६ (प्रतिनिधी)**

तेल्हारा तालुक्यातील अडगांव बु येथे ३१ वर्षापूर्वी एकत्र शिकत असलेल्या जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालय च्या माजी विद्यार्थ्यांची पुन्हा एकदा भरली शाळा चाळीशी ओलांडलेल्या विद्यार्थ्यांनी त्या काळातील मित्र-मैत्रिणींनी शालेय जीवनातील आठवणीला उजाळा दिला निमित्त होतं ९३ ९४ वर्षी इयत्ता दहावीत शिकत असलेल्या तिन्ही तुकड्यांचे स्नेह मिलन सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला.स्थानिक जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालय येथे दिनांक २२/ ३ /२५ रोजी माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी स्वयंस्फूतीने आयोजित केलेल्या स्नेह मिलन सोहळा दिमागदार स्वरूपात शाळेच्या माजी विद्यार्थी माजी शिक्षक माजी कर्मचारी वृंदांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाला कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद महाविद्यालयाचे प्राचार्य श्री मेहरे सर होते तर प्रमुख उपस्थितीत त्यावेळेस चे माजी शिक्षक श्री रुमाले सर अहेरकर सर ,निमकर्डे सर, खंडारे सर,साबळे सर, टिकार सर,धनाडे सर,वाकोडे सर, मारोटकर सर,इंगळे सर,रायबोले मॅडम, जाधव सर,गायकवाड सर कर्मचारी मोहन भाऊ बैरीसाल,नरवाडे भाऊ, दातकर भाऊ इत्यादी उपस्थित होते सर्वप्रथम राष्ट्रगीत नंतर सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली उपस्थित मान्यवर शिक्षक वर्ग तसेच कर्मचारी वर्ग यांचे विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

# भारतातील सर्वांत मोठी गणपती रांगोळी-अकोल्यातून विश्वविक्रमाची नोंद

## सौ.अमृता कुशल सेनाड यांनी साकारली

**▪अकोला,दि २६ (प्रतिनिधी)**

जगातील सर्वाधिक गणपतींचा अद्वितीय संग्रह असलेल्या नंद उद्यान व गणपती संग्रहालयात नंद संग्रहालयाच्या वतीने आणि नंद मित्र मंडळाच्या सहकार्याने २५ मार्च २०२५ रोजी एक ऐतिहासिक उपक्रम यशस्वीपणे पार पडला. श्री. प्रदीप नंद यांनी गेल्या ५० वर्षांपासून संकलित केलेल्या ६५,००० गणपतींच्या संग्रहाच्या प्रेरणेतून, भारतातील सर्वांत मोठी गणपती रांगोळी साकारण्याचा ऐतिहासिक विक्रम घडवण्यात आला.

१२,००० स्क्वेअर फूट क्षेत्रफळात, तब्बल अडीच हजार किलो रांगोळीचा वापर करून, सुप्रसिद्ध चित्रकार व कलाकार सौ. अमृता




कुशल सेनाड यांनी गणपतीच्या भव्य पोर्ट्रेट रांगोळीच्या माध्यमातून हा विक्रम प्रस्थापित केला. त्यांच्या अप्रतिम कलाकृतीने गणेशभक्ती आणि रांगोळी कलेचा सुंदर मिलाफ घडवला. हा अनोखा कलाविष्कार पाहण्यासाठी हजारो गणेशभक्त आणि कलाप्रेमींनी गर्दी केली होती. रांगोळीचे सौंदर्य पाहून उपस्थितांनी भारावून जाऊन त्याचे भरभरून कौतुक केले. य उपक्रमाची नोंद लंडन बुक्स ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, इंटरनॅशनल बुक



ऑफ रेकॉर्ड, आशिया बुक ऑफ्फ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स या संस्थानी घेऊन सौ अमृता यांना त्याविषयीचे प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

तसेंच अकोला जिल्हा भारतीय जनता पार्टी महिला शाखा तर्फ्रे सुद्धा सौ अमृता यांचे विशेष कौतुक करून त्यांचा यावेळी मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

या ऐतिहासिक विश्वविक्रम आयोजनामध्ये संग्रहालयाचे व्यवस्थापक डॉ. माधव देशमुख, सुधाकर देशमुख, धनंजय तायडे, श्रीकांत देशपांडे, राज पवित्रकार, अविनाश पाटील, आतिकखान पठाण, राजाभाऊ होरे, जितेंद्र इंगळे, आकाश इंगळे, मधुकर बोदडे, शिवम बोदडे, अनिकेत पडघान, शिवम जोशी, रुद्र जोशी, सलीम खान पठाण यांच्यासह नंद मित्र मंडळाचे विशेष योगदान राहिले. या ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार होण्याचा मान अकोल्याच्या नागरिकांना मिळाला, आणि या उपक्रमामुळे अकोल्याच्या नावलौकिकात निश्चितच भर पडली आहे.

# काँग्रेस आणि हिंदुत्व प्रेरित राष्ट्रवाद

**हिंदुत्व प्रेरित राष्ट्रवाद हा भारतीय राजकारणातील एक प्रमुख विचारसरणी बनला आहे, ज्याचा प्रभाव प्रत्येक स्तरावर दिसून येतो. भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नेतृत्वाखाली ही विचारसरणी देशाच्या राजकारणाचा केंद्रबिंदू बनली आहे. अशा परिस्थितीत, पारंपारिक धर्मनिरपेक्ष राजकारण करणाऱ्या काँग्रेससारख्या पक्षासमोर एक कठीण आव्हान आहे - ते आपली मूलभूत तत्त्वे अबाधित ठेवून आपली राजकीय प्रासंगिकता टिकवून ठेवू शकेल का, की त्यांना हिंदुत्व-प्रेरित राष्ट्रवादाकडे झुकावे लागेल?**

----------------

मोदी सरकारच्या गेल्या दोन कार्यकाळात, हिंदुत्वाने प्रेरित राष्ट्रवाद आता केवळ एक वैचारिक चळवळ राहिलेला नाही तर तो एक राजकीय वास्तव बनला आहे. यामागे काही प्रमुख कारणे आहेत - राम मंदिराचे बांधकाम, कलम ३७० हटवणे, नागरिकत्व सुधारणा कायदा (CAA) यासारख्या मुद्द्यांमुळे बहुसंख्य हिंदू समाज भाजपच्या जवळ आला आहे.

चीन, पाकिस्तानसारख्या देशांविरुद्ध कठोर भूमिका घेऊन आणि भारतीय सैन्याच्या कामगिरीचे ठळकपणे सादरीकरण केल्याने राष्ट्रवादाला चालना मिळाली आहे. त्याचप्रमाणे, 'संस्कृतीकृत भारत', हिंदी भाषेचा प्रचार आणि प्राचीन भारतीय परंपरांवर भर देण्याच्या दिशेने वाटचाल सुरू असल्याने एक नवीन सांस्कृतिक राष्ट्रवाद उदयास येत आहे.

काँग्रेसची कमकुवतपणाः काँग्रेसमधील नेतृत्व संकट, स्पष्ट वैचारिक दिशानिर्देशाचा अभाव आणि संघटनात्मक कमकुवतपणा यामुळे भाजपला मोकळे मैदान मिळाले आहे.

अलिकडेच राहुल गांधी दोन दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर होते. अहमदाबादमधील प्रमुख नेत्यांसोबत झालेल्या बैठकीत, त्यांनी त्यांच्या नेत्यांवर दुसऱ्या पक्षासाठी, भाजपसाठी काम करण्याचा आरोप करण्यापासून ते त्यांना बारात के घोडे असे संबोधण्यापर्यंत मजल मारली. भाजपसोबत काम करणाऱ्या ३०-४० काँग्रेस नेत्यांना बाहेर काढण्याबद्दलही त्यांनी बोलले.

रागाच्या भरात किंवा चिडून विधान करण्याचा संदेश केवळ गुजरातमधीलच नव्हे तर संपूर्ण देशातील सामान्य काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये सकारात्मक गेला नसेल. राहुल गांधी आणि त्यांचे रणनीतीकार असे म्हणू शकतात की जर काँग्रेसला सर्वत्र निवडणुका जिंकायच्या असतील आणि राष्ट्रीय पातळीवर सत्तेत यायचे असेल, तर देशद्रोही आणि पक्षाच्या विचारसरणी आणि ध्येयानुसार काम न करणाऱ्यांना बाहेर फेकून द्यावे लागेल.





काँग्रेसचे राजकारण ऐतिहासिकदृष्ट्या बहुलवादी आणि धर्मनिरपेक्ष राहिले आहे, परंतु आजच्या वातावरणात त्यांना या भूमिकेची पुनर्परिभाषा करावी लागेल. राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्यासारखे काही काँग्रेस नेत्यांनी अलिकडच्या काळात मंदिरांना भेटी दिल्या आणि त्यांची हिंदू ओळख अधोरेखित करत आहेत.

२०१७ च्या गुजरात विधानसभा निवडणुकीत राहुल गांधींनी स्वतःला जनेउधारी हिंदू असे संबोधले. मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि राजस्थानमधील काँग्रेस सरकारांनी गोशाळा आणि राम वनगमन पथ सारख्या धार्मिक प्रकल्पांना पाठिंबा दिला.

काँग्रेसने आपली धर्मनिरपेक्ष प्रतिमा आणखी मजबूत करावी आणि अल्पसंख्याक तसेच दलित आणि मागासवर्गीयांचा आवाज उठवावा असे मानणारा एक गट आहे. तथापि, या धोरणाचे यश संशयास्पद आहे कारण भाजप काँग्रेसवर तुष्टीकरणाचा आरोप करून हिंदू मतदारांना आणखी एकत्र करू शकते.



डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार
9422125656

काँग्रेसमध्ये बऱ्याच काळापासून एक वैचारिक संघर्ष सुरू आहे, जो वेळोवेळी समोर येत राहतो. केरळमध्ये तिरुअनंतपुरमचे खासदार आणि ज्येष्ठ नेते शशी थरूर यांचे प्रकरण समोर आले आहे. थरूर हे मोठे नेते असल्याने, त्यांचे प्रकरण देशभर चर्चेत आले. प्रत्येक राज्यात असे अनेक नेते आहेत ज्यांना समान संशयाने पाहिले जात आहे. जर एखाद्या पक्षात एकमेकांबद्दल संशयाचे वातावरण असेल तर त्यांची काय अवस्था होईल याची तुम्ही कल्पना करू शकता.

दुसरीकडे, काँग्रेस आरएसएस आणि भाजपला चुकीचे हिंदुत्ववादी म्हणते. एकेकाळी, राहुल आणि त्यांचे माजी रणनीतीकार देखील धार्मिक असल्याचे भासवत होते. ते एका मंदिरातून दुसऱ्या मंदिरात जात होते. त्यावेळी राहुलचे वर्णन जानवेधारी हिंदू ब्राह्मण असे केले जात असे. त्यांनी कैलास मानसरोवरची यात्राही केली.

यामागील रणनीती अशी होती की जर काँग्रेस आणि त्यांच्या नेतृत्वाला पंतप्रधान मोदींना तोंड द्यायचे असेल तर त्यांना हिंदुत्व प्रेरित राष्ट्रवाद स्वीकारावा लागेल. अनेक काँग्रेस नेते सार्वजनिक व्यासपीठांवर स्वतःला हिंदू आणि धार्मिक म्हणवू लागले. तो भाजप, आरएसएस किंवा मोदींचा समर्थक बनला का? जर काँग्रेसने हिंदुत्व प्रेरित राष्ट्रवादाच्या मार्गाने स्वतःला बदलण्याचा निर्णय घेतला, तर त्यांना भाजपच्या तुलनेत काँग्रेसची हिंदुत्वाची प्रतिमा कमकुवत असल्याने अनेक अडचणींना तोंड द्यावे लागेल. भाजपचे हिंदुत्व सुसंघटित आणि वैचारिकदृष्ट्या परिपक्व आहे, तर काँग्रेससाठी ते केवळ एक राजकीय रणनीती असेल जी मतदारांना गोंधळात टाकू शकते.

जर काँग्रेसने उघडपणे हिंदुत्व प्रेरित राष्ट्रवादाकडे वाटचाल केली तर त्यांची पारंपारिक मुस्लिम, दलित आणि मागासलेली मतपेढी त्यापासून दूर जाऊ शकते. काँग्रेसमध्येच असे अनेक नेते आहेत जे मृदू हिंदुत्वाच्या राजकारणाच्या विरोधात आहेत आणि ते पक्षाच्या मूलभूत विचारसरणीच्या विरोधात मानतात.

सध्याच्या भारतीय राजकारणाचे सत्य हे आहे की उघडपणे किंवा मूकपणे हिंदुत्वाचे समर्थक प्रत्येक पक्षात वाढले आहेत. काही नेते आणि पक्षांना या वास्तवाचा सामना करावा लागला आहे की कोणत्याही परिस्थितीत हिंदुत्वविरोधी म्हणून पाहिले गेल्यास त्यांच्या मतपेढीवर विपरीत परिणाम होईल. त्याला स्वतःला हिंदू आणि धार्मिक व्यक्ती म्हणून सार्वजनिकरित्या प्रदर्शित करावे लागेल.

काँग्रेससाठी, हिंदुत्व-प्रेरित राष्ट्रवादाचे राजकारण स्वीकारणे ही दुधारी तलवार आहे. जर त्यांनी हे स्वीकारले तर भाजपच्या तुलनेत त्यांची वेगळी ओळख गमावू शकते; आणि जर ती त्यापासून दूर राहिली तर हिंदू मतदारांचा एक मोठा वर्ग परत मिळवणे कठीण होईल.

अशा परिस्थितीत, काँग्रेसला भारतीय राष्ट्रवादाची एक नवीन व्याख्या तयार करावी लागेल, जी केवळ धर्मनिरपेक्षच नाही तर सांस्कृतिकदृष्ट्या भारतीय लोकांना आकर्षित करणारी देखील असली पाहिजे.

■ ■ ■

# प्रदूषणाचा भस्मासुर !

स्विस संस्था आयक्युएअरने जागतिक प्रदूषणावर ११ मार्च २०२५ रोजी एक अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे . कारण या अहवालानुसार जगातील सर्वाधिक प्रदूषित २० शहरात १३ शहरे भारतातील आहेत.

या अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की भारत जगातील पाचव्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून आसाम राज्यातील आसाम आणि मेघालयाच्या सीमेवर असणाऱ्या बर्णीहाट हे शहर जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर ठरले आहे. तर जगातील १३८ देशांच्या राजधानीच्या शहरांपैकी दिल्ली हे सर्वात प्रदूषित राजधानीचे शहर असल्याची नोंद या अहवालात करण्यात आली आहे.

या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३८ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ८९५४ शहरांची माहिती संकलित करण्यात आली.

या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, पंजाबमधील मुलतानपूर, हरियाणामधील लोणी, नवी दिल्ली, गुरुग्राम, गंगानगर, ग्रेटर नोएडा, भिवडी, ( राजस्थान - हरियाणा सीमेवरील राजस्थानच्या अल्वर तालुक्यातील शहर) मुज्झफरनगर, हनुमानगड, नोएडा या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले.

स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत.

प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर येते. प्रदूषणामुळे दिल्लीत खेळला जाणारा रणजी सामना रद्द करावा लागला होता.

चार वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा होता त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे.

मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई - दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही.

या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे.

वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे.

वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणा?या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम - विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत.

युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कच?याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.

■ ■ ■

# औरंगजेबाच्या कबरीवरून महाभारत!

छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित चित्रपट 'छावा' प्रदर्शित झाल्यापासून औरंगजेबाचा विषय पुनर्चर्चेत आलेला आहे. अन्यथा लोकांना याचेशी काहीही देणेघेणे नव्हते. क्रुरकर्मा ही एक मानसिक अपप्रवृत्ती आहे.मानसिक परिवर्तनानेच कुठलाही नरसंहार हा थांबविता येत असतो.

रामायणातील वाल्या कोळीचे मतपरिवर्तन नारदाने केल्याने तो वाल्याचा महर्षि वाल्मिकी झाला. त्याच्या हातून रामायणासारखे महाकाव्य रचल्या गेले. तसेच अंगुलिमाल डाकू भगवान बुद्धांच्या संपर्कात येताच त्यांचे मतपरिवर्तन केले गेल्याने ते संत बनले. सांगायचे तात्पर्य हेच की कुठल्याही जबरदस्तीने मत परिवर्तन हे होत नसते. त्यातल्या त्यात समाजाचे तर होणे हे महान कठीण काम ठरते आहे. राजेरजवाड्यांच्या काळात हे शक्य होत असे. कारण ते स्वयंभू राजे होते. ते मनमानी पद्धतीने राज्य कारभार करू शकत होते.

मिलिंद गड्डमवार
सामाजिक कार्यकर्ते, मुक्त पत्रकार
राजुरा, जि. चंद्रपूर
९५११२१५२००

आज राजेशाही ही संपुर्णपणे नष्ट झालेली आहे. परंतु ती अपप्रवृत्ती, मानसिकता ही आजही अनेकांमध्ये पहायला मिळते आहे. यासाठीचे आज कायदे आहेत. तेंव्हा कायद्यानेच कुठलेही प्रश्न हे सोडवीले जाऊ शकतात. बळजबरीने करण्याचा प्रयत्न केला गेल्यास दंगेपसादला तोंड द्यावे लागते. यामुळे निष्पाप लोकांचा यात बळी जात असतो.संपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असते. ते भरून निघणारे नसते. नुकतीच नागपूर मध्ये महाल परिसरात घडलेली घटना याची साक्ष देते आहे. यामुळे पोलिस यंत्रणेवर विनाकारणचा ताण निर्माण होतो आहे. त्यांना नको ती दुषणे देऊन समाज मोकळा होतो आहे. दुषणे देणे सोपे काम असते. आक्रीत समाजाला रोखणे हे महाकठीण काम असते.जे पोलिसांना करावे लागते.ते ही स्वतःचा जीव धोक्यात घालून ! समाज दोन्ही बाजूने बोलण्यास मोकळा असतो.त्याचेवर कुठलेही बंधने नाहीत.

औरंगजेबाच्या कबरी वरून चालणारे राजकारण हे चुकीचेच वाटते आहे.त्या वेळेला जे कुणी राज्यकर्ते होते त्यांनी त्या त्या परिस्थितीत घेतलेला तो निर्णय होता. आज जर तो निर्णय आपल्या व्यक्तीगत स्वार्थासाठी योग्य वाटत नसेल तर त्याकडे दुर्लक्ष केलेले बरे. ऐवढेच आपले हाती आहे.

आपणं कुणी महाराजा लागून गेलेलो नाहीत? की जे स्वतःचा निर्णय ठामपणे घेऊ शकतील आणि त्या निर्णयाला कुणाचा विरोध करण्याची हिंमत होणार नाही.

आज आपणं लोकशाही व्यवस्थेत वावरतो आहे. बऱ्याच जणांना तर औरंगाबादमध्ये औरंगजेबाची कबर आहे याची माहिती पणं नव्हती. ती छावा सिनेमा प्रदर्शित झाल्याने त्याचा उदो उदो केला गेल्याने थोड्याफार प्रमाणात लोकांना याची माहिती झाली. आज त्याचे चुकीचे राजकारण केले जात आहे. ही दुर्दैवाची बाब ठरते आहे.यात समाजकंटक आपले हात धुवून घेत असतात. हे विसरून चालणार नाही.

अमेरिकेने पाकिस्तानमध्ये घुसून ओसामा बिन लादेनला, क्रुरकर्माला ठार केले होते. त्याचे उदात्तीकरण होऊ नये म्हणून त्याचा पुरावा नष्ट करण्यासाठी त्याचा मृतदेह समुद्रात टाकला गेला होता असे सांगितले जाते. ' न रहेगा बास, न रहेगी बासुरी ' अशी भुमिका घेतली गेली होती. ती योग्य होती असेच म्हणावे लागेल. इतिहास हा इतिहास असतो त्याला जास्त महत्त्व देता कामा नये. आपणं वर्तमान काळात जगत असतो. तेंव्हा आपला काळ कसा चांगला जाईल याचा विचार व्हावा. जनतेचे कल्याण कसे साधले जाईल यावर विचार व्हायला हवा.

छ.शिवाजी महाराजांच्या काळात कायद्याचे राज्य होते.आज तर कायदे खुलेपणाने पायदळी तुडवीले जात आहेत. यात राजकारणी लोक आघाडीवर आहेत. ते सामान्य लोकांवर अन्याय करून सत्ता, संपत्ती बळजबरीने प्राप्त करू इच्छित आहेत. जे चुकीचे चालले आहे. याचे वाईट परिणाम आज महाराष्ट्रातील बीडकरांना व जनतेला भोगावे लागते आहे.

बीड तर आज चुकीच्या कामांसाठी कुप्रसिद्ध झालेले आहे. आज सगळीकडेच थोड्याफार प्रमाणात हीच परिस्थिती दिसून येत आहे. राज्यकर्ते हे मस्तवाल झाले आहेत. ते स्वतःला जनतेचे सेवक समजत नाहीत तर राज्यकर्ते समजत आहेत. ते आलिशान गाडीतून फिरून, स्वतः सुरक्षित बंगल्याचा सहारा घेतात. स्वतःसाठी सरकारी सुरक्षा मागून घेतात. यामुळे जनतेची सुरक्षा वाऱ्यावर निघाली आहे.

पोलिसांना राज्यकर्ते लोकांची सुरक्षा करण्यासाठी नेमले जात आहे.मग जनतेची सुरक्षा कोण करणार आहे? असा प्रश्न यातून उपस्थित होतो आहे. आज संसदेत,विधानसभेत, कायदेमंडळात जनतेच्या समस्यांवर कुणीही बोलत नाहीत. निव्वळ स्मारकांच्या बांधकामावर बोलले जात आहे.

लोकांनी,मतदारांनी पणं याचा विरोध केलेला आढळून येत नसल्याने शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या, नागरिकांच्या समस्या जिथल्या तिथेच आहेत. सत्ताधारी, विरोधक नको त्या राजकारणात व्यस्त आहेत. ते समाजा समाजात वैरभाव निर्माण करून आपली सत्तेची फळे चाखत आहेत. तर सामान्य व गरीब जनता दैनीय अवस्थेत आजही जगत आहेत. यासाठी आता जनतेनेच राजकारणाची दिशा बदलण्यासाठी पाऊल उचलले पाहिजे.

हा देश जनतेचा आहे. कुणा राज्यकर्ते लोकांची ही मालमत्ता नाही. याची जाणीव राज्यकर्ते मंडळींना जनतेनेच करून दिली पाहिजे. त्यांच्या सर्व सुखसोयी, सुरक्षा, सुविधा या काढून घेतल्या पाहिजेत. तरच त्यांचे डोके ठिकाणावर येऊन ते खरे राज्यकर्ते साबीत होऊ शकतील असे वाटते आहे. याचा विचार जनतेने करावा.

■ ■ ■

# या लोकांनी अजिबात पिऊ नये ऊसाचा रस..



उन्हाचा तडाखा आता वाढत जाणार आहे. अनेक जण ऊन्हाळ्यात ऊसाचा रस पिऊन जीव शांत करीत असतात. ऊसाच्या रसात कॅल्शियम, तांबे, मॅग्नीशियम, मँगनीज, झिंक, आयर्न आणि पोटॅशियम अशी तत्वं आहेत. ऊसाचा रस आरोग्यासाठी खूपच फायदेशीर आहे. ऊसाचा रस जेव्हा काढला जातो. तेव्हा त्यात १५ टक्के कच्ची साखर असते. ती फळांच्या स्मूदीहून कमी असते.

जरी ऊसाचा रस आरोग्यासाठी चांगला असला तरी काही लोकांसाठी ऊसाचा रस धोकादायक देखील असू शकतो. त्यामुळे ऊसाचा रस कोणी पिऊ नये याची माहीती लक्षात ठेवायला हवी.

तज्ज्ञाच्या मते ऊसाचा रसात पॉलीकोसॅनॉल नावाचे तत्व आढळते. हे रक्ताला पातळ करण्यात मदत करते. रक्तात गुठल्या तयार होऊ देत नाही.यामुळे हृदयविकार असणाऱ्यांसाठी ऊसाचा रस चांगला आहे. मात्र, जखम झाली तर ऊसाचा रस प्यायल्याने जास्त रक्तस्राव होऊ शकतो.

**कोणी ऊसाचा रस पिऊ नये?**

**डायबिटीजः** २४० एमएल ऊसाच्या रसात ५० ग्रॅम साखर असते. ती १२ चमच्यांबरोबर असते. पण ऊसाच्या रसात ग्लायसेमिक इंडेक्स (जीआय) कमी असते. तर ग्लायसेमिक लोड (जीएल) जास्त असते. त्यामुळे ऊसाचा रस ब्लड शुगरला वाढवतो. त्यामुळे डायबिटीज असणाऱ्यांनी चुकूनही ऊसाच्या रसाच्या वाट्याला जाऊ नये.

**सर्दी-पडसेः** डोकेदुखी, सर्दी आणि पडसे सारख्या त्रासात ऊसाचा रस अजिबात घेऊ नये, त्यामुळे तब्येत आणखीनच खराब होऊ शकते. ऊसाच्या रसाचा गुणधर्म थंड आहे. त्यामुळे पोलीकोसॅनॉल डोकेदुखी होऊ शकते.

**अनिद्राः** ज्यांना अनिद्रेचा त्रास आहे त्यांनी ऊसाचा रस घेऊ नये, ऊसाच्या रसात आढळणारे पोलीकोसॅनॉल तुम्हाला अनिद्रा देऊ शकते. तुम्हाला आधीपासून ताणतणाव आणि अनिद्रेची समस्या असेल तर ऊसाचा रस अजिबात घेऊ नकाा

**कोलेस्ट्रॉलः** जर तुमच्या शरीरात कोलेस्ट्रॉल वाढले असेल तर ऊसाच्या सेवनापासून दूर राहीले पाहीजे. कारण गुड कोलेस्ट्रॉलला बॅड कोलेस्ट्रॉलमध्ये कन्व्हर्ट करते. त्यामुळे ऊसाचा रस प्यायल्याने बॅड कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढू शकते.

■ ■ ■

# भारतात उच्च पदांवर केवळ १९% महिला

भारतात महिलांची लोकसंख्या ६५ कोटींहून अधिक आहे. यानंतरही, फक्त १९ टक्के म्हणजेच १२ कोटी महिला उच्च पदांवर काम करत आहेत. टीमलीजच्या अहवालानुसार, प्रवेश स्तरावर फक्त ४६ टक्के पदे महिलांकडे आहेत.

या अहवालात महिलांमधील बेरोजगारीचा दर २.९ टक्क्यांवरून ३.२ टक्क्यांपर्यंत वाढल्याचेही अधोरेखित करण्यात आले आहे. यावरून असे दिसून येते की महिलांना नोकरीची स्थिरता आणि रोजगार मिळविण्यासाठी खूप संघर्ष करावा लागतो. याचे प्रमुख कारण म्हणजे मुलींच्या शिक्षणाचा अभाव आणि असमानता.

२०११ च्या जनगणनेनुसार, भारतातील फक्त ६५% महिला साक्षर आहेत, तर पुरुषांचा साक्षरता दर ८०% आहे. भारताचा राष्ट्रीय साक्षरता दर फक्त ७४% आहे, जो जागतिक सरासरीपेक्षा (८३%) कमी आहे.

तथापि, २०२२-२३ च्या आकडेवारीनुसार, ४८.३% मुली उच्च माध्यमिक स्तरावर नोंदणीकृत आहेत. महिला नोंदणी ३८.४% ने वाढली आहे, १.५७ कोटींवरून २.१८ कोटी झाली आहे.

लैंगिक समानतेत सुधारणा होऊनही, कार्यबलात महिलांचे प्रतिनिधित्व कमीच आहे. २०२३ पर्यंत, जागतिक कामगार दलात महिलांचा सहभाग दर ४७% होता, तर पुरुषांचा तो ७२% होता. दोघांच्या सहभागात २५% पेक्षा जास्त फरक आहे.

ही असमानता मुख्यत्वे सामाजिक नियम आणि लिंग अपेक्षांमुळे प्रभावित आहे, जे महिलांना प्रामुख्याने काळजीवाहू म्हणून आणि पुरुषांना कमावता म्हणून स्थान देतात. काळजी आणि घरगुती जबाबदाऱ्यांचे असमान वितरण हे महिलांच्या आर्थिक सहभागासाठी एक महत्त्वाचा अडथळा आहे.


सरासरी, महिला घर आणि मुलांची काळजी घेण्यासाठी पुरुषांपेक्षा दररोज २.८ तास जास्त खर्च करतात. अहवालानुसार, २०५० पर्यंत, महिला दररोज २.३ तास जास्त किंवा पुरुषांपेक्षा ९.५% जास्त वेळ घरकामात घालवतील.

२०२३-२४ मध्ये भारताच्या कार्यबल सहभाग दरात सतत वाढ होण्याची अपेक्षा आहे. १५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या व्यक्तींचा कामगार दर ६०.१% पर्यंत पोहोचला आहे, जो २०२२-२३ मध्ये ५७.९% होता. तथापि, पुरुषांचा LFPR दर (८०.६%) महिलांच्या (४३.७%) तुलनेत जवळजवळ दुप्पट आहे.

**महिलांच्या रोजगाराचे औपचारिकीकरण करण्याची गरज**

मेघालय, हिमाचल प्रदेश, अरुणाचल प्रदेश, नागालँड आणि सिक्कीममध्ये मजबूत सांस्कृतिक स्वीकृती, आदिवासी अर्थव्यवस्था, मातृसत्ताक समाज, शेती आणि हस्तकला यासारख्या पारंपारिक उद्योगांवर अवलंबून राहणे यामुळे महिलांचा सहभाग दर चांगला आहे.

**महिला कामगारांमध्ये भारतातील टॉप 5 राज्ये**




याउलट, पश्चिम बंगाल, हरियाणा, बिहार आणि पंजाबसारख्या राज्यांमध्ये महिला कामगारांचा सहभाग सर्वात कमी आहे, ज्याचे मुख्य कारण शहरीकरण, सुरक्षा चिंता, लिंगभेद आणि रोजगाराच्या पर्यायांचा अभाव आहे.

या तफावतीमुळे धोरणात्मक हस्तक्षेप आवश्यक आहे. जे महिलांच्या रोजगाराचे औपचारिकीकरण, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता सुधारणे, कौशल्य विकासाचा विस्तार करण्यावर लक्ष केंद्रित करते.

भारताच्या आर्थिक प्रगतीत कोणतीही महिला मागे राहू नये, यासाठी या आव्हानांना तोंड देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतात, कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या ७६.९% लोक ग्रामीण महिला आहेत. तर पुरुषांची संख्या फक्त ४९.४% एवढीच आहे.

■ ■ ■

# इतर धनदांडग्यांचे काय?

**वाचक लिहितात**

नागपूर शहरात दंगल उसळण्याला आता दहा दिवसांपेक्षा अधिक काळ लोटला. जनजीवन सामान्य झाले आहे, बाजारपेठा, दुकानदारी, खरेदी विक्री पूर्ववत सुरू झाली आहे. परंतु, या दंगलीत एका निष्पाप तरूणाचा हकनाक बळी गेल्याने अंतर्गत आग कुठेतरी धुमसत असावी . या दंगल प्रकरणात मुस्लीम समुदायातील फहिम खान नामक तरूणाच्या घरावर बुलडोझर चालवून भूईसपाट करण्यात आले. अर्थात, ही कारवाई मनपाने स्वतःच्या ईच्छेने नव्हे तर कुणीतरी आकाच्या सांगण्यावरून केली असावी. परंतु, ६० लाख लोकसंख्येच्या नागपूर शहरात एकट्या फहिम खानचेच अतिक्रमण होते का? हा खरा प्रश्न आहे.

शहराच्या कोणत्याही भागात जा, राजकीय पक्ष आणि त्यांनी पोसलेल्या विविध संघटनांच्या नेत्यांनी कार्यालयाच्या नावावर किंवा स्वतः सरकारी जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केल्याचे पाहायला मिळते . हे अतिक्रमण काढले जावू नये म्हणून काही जागेवर दर्गा, मंदिर उभारण्यात आले आहेत तर कुठे देवीदेवतांच्या मुर्त्या ठेवण्यात आल्यात. पथकाने कारवाईचा बडगा उगारला तर धार्मिक कारण पुढे करीत झेंडे घेवून मोर्च काढायला सगळेच तयार. नागपूर मनपा आणि एनआयटीच्या कितीतरी एकर जागेवर राजकीय पुढारी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी अतिक्रमण केले आहे .परंतु, आजतागायत नागपुरात कुणाच्या घरावर बुलझोडर चालविण्यात आल्याचे ऐकिवात नाही. आता राज्याचे गृहखाते सांभाळणारे मुख्यमंत्री उत्तर प्रदेशचा योगी पॅटर्न महाराष्ट्रात आणू पाहत आहेत का? कुण्या एका पक्षावर द्वेषभावनेतून कारवाई करणे योग्य नव्हे.

■ जनार्धन चित्रीव, नागपूर.

# अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



**भंडारे - बंधारे**

लाखो रुपये खर्चुन
करतो आम्ही भंडारे
'काळीमाय ' तहानलेली
बांधा गावोगावी बंधारे..!

पावसाचं पाणी
सारं जातं वाहून
पाणी टंचाई निवारणार्थ
बंधारे पाहावे बांधून ..!

जल है तो कल है
म्हणवा नाही खोटा
काटकसरीने वापरावे पाणी
तर टळेल गंभीर धोका .. !

# शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर: आरोग्य सेवेतील अग्रगण्य विस्तार!

**नागपूर, २६ मार्च :** नागपूरच्या हिंगणा, वानाडोंगरी येथील निसर्गरम्य वातावरणात वसलेले शालिनीताई मेघे हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर (एसएमएचआरसी) हे आरोग्य क्षेत्रात नवे आदर्श निर्माण करत आहे. अवघ्या दोन वर्षांत एसएमएचआरसीने ४५० खाटांवरून १०२० खाटांच्या मल्टी-सुपर स्पेशालिटी रुग्णालयात विस्तार केला आहे. हे रुग्णालय भारतातील ८०% लोकसंख्येला सुलभ आणि गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सेवा पुरविण्यास तत्पर आहे. या रुग्णालयात पूर्णवेळ कार्यरत, अनुभवी डॉक्टर सेवाभावी वृत्तीने विविध स्पेशालिटी आणि सुपर स्पेशालिटी आरोग्य उपचार आणि सुविधा पुरवतात. येथील आपत्कालीन वैद्यकीय विभाग आणि अत्याधुनिक ६५ खाटांचे सीसीयू (क्रिटिकल केअर युनिट) विभाग नेहमीच रुग्णांनी भरलेले असते. त्यामुळे वाढत्या रुग्णसंख्येचा विचार करून रुग्णालयाने श्री सागरजी मेघे यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली पुढील वर्षात आणखी विस्तार करण्याची योजना आखली आहे.

एसएमएचआरसीसाठी आणखी एक मोठी उपलब्धी म्हणजे सीएस(एमए) म्हणजेच सेंट्रल सर्विसेस मेडिकल अटेन्डन्स रूल्स १९९४ च्या नियमांनुसार मिळालेली सरकारी मान्यता. यामुळे आता सीजीएचएस (सेंट्रल गव्हर्नमेंट हेल्थ स्कीम) कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना येथे सरकारी नियमांनुसार वैद्यकीय सेवा मिळू शकते.

भारत सरकारच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या उपसचिव श्रीमती हेमलता सिंह यांनी स्वाक्षरी केलेला अधिकृत आदेश एसएसएचआरसीने मोठ्या कृतज्ञतेने स्वीकारला. या महत्त्वाच्या मान्यतेच्या घोषणेनंतर, दत्ता मेघे इंस्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (डीयू) ऑफ-कॅम्पस, नागपूरचे संचालक डॉ. अनुप मारार यांनी माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस, माननीय पालकमंत्री श्री चंद्रशेखर बावनकुळे आणि माननीय आमदार श्री समीरजी मेघे यांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांनी स्पष्ट केले की, या सर्व मान्यवरांनी केंद्रीय मंत्रालयाकडे केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे आणि बहुमूल्य शिफारशींमुळे सीजीएचएस लाभार्थ्यांना आता एसएमएचआरसी मध्ये सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवांचा लाभ घेता येणार आहे.

या मान्यतेनंतर एसएमएचआरसी हे सीजीएचएस लाभार्थ्यांना सेवा देणारे नागपूर विभागातील सर्वात मोठे रुग्णालय बनले आहे.

एसएमएचआरसी चे मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. वसंत गावंडे यांनी दत्ता मेघे इंस्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (डीयू) संस्थेचे प्रधान सल्लागार माननीय श्री सागरजी मेघे यांचे अमूल्य मार्गदर्शन आणि वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.

एसएमएचआरसी चे सहायक वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुधीर सिंह यांनी केंद्रीय सरकारी कर्मचारी कल्याण समन्वय समितीचे सचिव डॉ. एम. ए. राव यांचे त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आणि पाठिंब्याबद्दल विशेष कृतज्ञता व्यक्त केली.

एसएमएचआरसी चे ऑपरेशन मॅनेजर श्री सुनील सुरे आणि त्यांच्या टीमने सातत्याने ठेवलेला प्रशासकीय समन्वय आणि वर्षभराच्या सातत्यपूर्ण अथक मेहनतीमुळे हे ऐतिहासिक यश मिळाले असून त्यांचे विशेष कौतुक आहे.

अधिक माहिती किंवा मदतीसाठी, सीजीएचएस लाभार्थी एसएमएचआरसी चे ऑपरेशन मॅनेजर श्री सुनील सुरे यांच्याशी संपर्क साधू शकतात.

# आकाश इन्विक्टस जेईई तयारीसाठी अंतिम गेम चेंजर प्रोग्राम




**नागपूर, २६ मार्च :** आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड, भारतातील अग्रेसर टेस्ट प्रिपरेटरी संस्था, अभियांत्रिकी क्षेत्रातील सर्वोत्तम आणि प्रतिभावान विद्यार्थ्यांसाठी आकाश इन्विक्टस हा नाविन्यपूर्ण आणि उच्चस्तरीय जेईई तयारी प्रोग्राम लॉन्च करत आहे. IIT किंवा प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमध्ये प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा AI समर्थित, वैयक्तिकृत, उच्च-तीव्रतेचा आणि निकाल-केंद्रित उपक्रम आहे.

आकाश इन्विक्टस अंतर्गत ५०० हून अधिक जेईई तज्ज्ञ शिक्षक एकत्र येणार आहेत, ज्यांचा IIT मार्गदर्शनात सिद्धहस्त अनुभव आहे. सर्वोच्च IIT रँक मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा अभ्यासक्रम आधुनिक आणि नीटनेटका पद्धतीने तयार करण्यात आला आहे. हा प्रोग्राम फिजिटल शिक्षण पद्धतीचा अवलंब करतो, जिथे AI सक्षम आणि अडॅप्टिव्ह लर्निंगचा उपयोग करून विद्यार्थ्यांना JEE Advanced परीक्षेच्या सर्वोत्तम तयारीसाठी विशेष अध्ययन संसाधने दिली जातील.

या कठोर अभ्यासक्रमात संपूर्ण पुनरावलोकन आणि चाचणी मॉड्यूल समाविष्ट आहे, जे विद्यार्थ्यांना परीक्षेच्या अंतिम टप्प्यात केंद्रित तयारी करण्यास मदत करेल. विद्यार्थ्यांना विशेष अभ्यासक्रम, शंका-निवारण सत्रे आणि उत्कृष्ट निकाल मिळवण्यासाठी संपूर्ण नियोजित टेस्ट सिरीजचा लाभ मिळेल. आकाश इन्विक्टस लहान बॅचेसमध्ये शिकवले जाईल, जेणेकरून प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक लक्ष दिले जाऊ शकेल.

आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. दीपक मेहरोत्रा यांनी या कार्यक्रमाच्या महत्त्वावर भर देत सांगितले,

ते पुढे म्हणाले, हा कार्यक्रम काही महिन्यांपूर्वी सुरू करण्यात आला असून, आतापर्यंत २५००+ सर्वोत्तम विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. तीन मुख्य आधारस्तंभांवर उभा असलेला नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती व अभ्याससाहित्य, तज्ज्ञ प्राध्यापक आणि प्रगत AI साधने 'आकाश इन्विक्टस' जेईई तयारीसाठी नवीन मानदंड निर्माण करेल. हे सर्व वैशिष्ट्ये आकाशच्या विश्वासार्हता, गुणवत्तेच्या वचनबद्धतेसह तांत्रिक कौशल्याने समर्थित आहेत.

'आकाश इन्विक्टस' मध्ये प्रवेश अत्यंत निवडक पद्धतीने दिला जातो. केवळ सर्वोत्कृष्ट आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा यासाठी खास प्रवेश चाचणी घेतली जाते. हा कार्यक्रम वीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दोन वर्षांचा आणि ०वीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तीन वर्षांचा आहे. हा कोर्स दिल्ली NCR, चंदीगड, लखनऊ, मेरठ, प्रयागराज, कानपूर, वाराणसी, जयपूर, कोटा, पटना, रांची, बोकारो, कोलकाता, दुर्गापूर, भुवनेश्वर, मुंबई, पुणे, नागपूर, अहमदाबाद, वडोदरा, इंदौर, भोपाळ, हैदराबाद, चेन्नई, बेंगळुरू, देहरादून आणि मदुराई यासारख्या ४०+ शहरांमध्ये उपलब्ध असेल.

हा कोर्स उच्च शैक्षणिक निकष व सतत बदलणाऱ्या परीक्षेच्या स्वरूपाशी सुसंगत राहील, याची खात्री करण्यासाठी एक समर्पित संशोधन संघ या अभ्यासक्रमाची निर्मिती करत आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना परिवर्तनात्मक शैक्षणिक अनुभव मिळेल.

# यंदाच्या 'आयपीएल'मध्ये एम. एस. धोनीचा अतूट वारसा 'मेन ऑफ प्लॅटिनम'बरोबर साजरा करण्याची संधी

**नागपूर, २६ मार्च :** 'इंडियन प्रीमियर लिग' अर्थात आयपीएलचा हंगाम सुरू होताच क्रिकेटचा उत्साह शिगेला पोहोचतो. त्यातही विशेष बाब म्हणजे एम.एस.धोनी अर्थात सर्वांचा लाडका 'थाला' पुन्हा एकदा पिवळी जर्सी घालण्यासाठी सज्ज होतो. त्यामुळे देशभरातील त्याच्या चाहत्यांमध्ये एकप्रकारचा उत्साह संचारतो. एम. एस. धोनीच्या प्रत्येक चाहत्यासाठी हा फक्त एक खेळ नसून ते एक अतूट बंधन आहे जे विश्वास, लवचिकता आणि कायमचे टिकणारे क्षण यावर गुंफला गेला आहे. यंदाच्या आयपीएल हंगामात या दिग्गजाचा सन्मान करा आणि दुर्मिळ प्लॅटिनमपासून बनवलेले, खेळामधील सर्वोत्तम खेळाडूंच्या वारशाइतकाच टिकाऊ धातू असलेल्या खास 'मेन ऑफ प्लॅटिनम'चे 'एम.एस. धोनी सिग्नेचर एडिशन' खरेदी करून स्वत: त्याचे चाहते असल्याचे अभिमानाने मिरवा. हा केवळ दागिनाच नाही, तर चाहत्यांसाठी त्यांची निष्ठा दाखवण्याचा, त्यांचा वारसा साजरा करण्याचा आणि त्यांच्या अतुलनीय भावनेचा एक तुकडा ते जिथे जातील तिथे घेऊन जाण्याचा हा एक मार्ग आहे. ९५ टक्के प्लॅटिनमपासून बनवलेल्या दागिन्यांच्या प्रत्येक तुकड्यात स्वच्छ, ठळक रेषा आणि किमान सौंदर्याचा समावेश आहे, धोनीची स्वाक्षरी त्याच्या प्रवासाचे प्रतीक म्हणून प्लॅटिनममध्ये कोरलेली आहे. ते एक जाड ब्रेसलेट असो, एक आकर्षक चैन असो किंवा स्टेटमेंट रिंग असो, प्रत्येक डिझाइन त्याच्या कालातीत आकर्षणासह अत्याधुनिकता पुनर्परिभाषा करते. या आयपीएल हंगामात तुमच्या सामन्याच्या दिवशीच्या पेहरावात प्लॅटिनम दागिन्यांचा समावेश करा.



तुम्ही जिथे जाल तिथे धोनीबद्दलच्या महान भावना घेऊन जाल.

सिग्नेचर कलेक्शनबद्दल धोनीने आपले मत व्यक्त केले आहे. तो म्हणतो की, माझ्या क्रिकेट कारकिर्दीत प्रत्येक आव्हान, विजय आणि पाठ/अध्यायाने मला घडवले, मला खरी ओळख मिळाली. जीवनात आणि मैदानावरही मला मार्गदर्शन करणारी मूल्ये माझ्या मनात रुजवली गेली आहेत. प्लॅटिनम धातू दुर्मिळ, लवचिक आणि टिकाऊ धाटणीने बांधलेले आहे. अगदी प्रत्येक आव्हानावर मात करण्यासाठी आवश्यक असलेल्या मानसिकतेप्रमाणेच त्याची बांधणी असते. माझ्यासाठी, प्लॅटिनमचे दागिने घालणे हे धैर्यवान असल्याची आठवण करून देणारे आहे. 'मेन ऑफ प्लॅटिनम'बरोबरचा सहयोग हेच यानिमित्त खास ठरते. या संग्रहातील प्रत्येक कलाकृती क्षणिक कलाच्या (ट्रेंड) पलीकडे जाते. हा संग्रह कालातीतपणाचे प्रतीक आहे. त्यातून चिकाटी, आत्म-अभिव्यक्ती आणि पुढे जाण्याची प्रेरणा मिळते.''

'मेन ऑफ प्लॅटिनम'च्या 'धोनी सिग्नेचर एडिशन'च्या काही दागिन्यांवर एक नजर टाकू, ज्यात ते परिधान करणाऱ्यांमध्ये एकप्रकारची समान महानता निर्माण करण्यासाठी खास डिझाइन केलेले आहेत. तुम्ही स्टँडवरून जल्लोष करत असाल, लाऊंजमध्ये सामन्याचा थरार अनुभवत असाल किंवा खास स्क्रीनिंगचे आयोजन करत असाल, तुमचे खेळाच्या दिवशीचे दिसणे हे अशा दागिन्यांनी अद्ययावत करा की जो तुमच्यातील आत्मविश्वास, शैली आणि अतूट विजयी भावना दर्शवतो.

# प्यार के लिए कोई उम्र की सीमा नहीं झी टीव्हीवरील एक प्रेमकथा शरद केळकर आणि निहारिका चौक्सी अभिनित तुम से तुम तक

**मुंबई, २६ मार्च :** भारतीय समाजात नातेसंबंध आणि लग्न हे साधारणपणे प्राचीन परंपरांनुसार ठरवले जातात जिथे वय, आर्थिक स्थिती आणि सामाजिक पार्श्वभूमी यांना महत्त्व दिले जाते. परंतु प्रेम हे नियमांचे पालन करत नाही ते स्वतःचा मार्ग ठरवते आणि आपल्या या प्रवासातील अडथळ्यांना पार करते. अनेक दशकांपासून झी टीव्ही वाहिनी कथाकथनामध्ये अग्रगण्य आहे आणि प्रेक्षकांसाठी विचारांना चालना देणाऱ्या, प्रचलित मान्यतांना आव्हान देणाऱ्या आणि नातेसंबंधांची नव्याने व्याख्या करणाऱ्या कथा सादर करत आली आहे. आता आपली नवीन मालिका 'तुम से तुम तक' सह ही वाहिनी सामाजिक परंपरांच्या पलीकडे जाणारी एक ताज्या दमाची आणि हृदयस्पर्शी प्रेमकथा सादर करत आहे.



ही मालिका मोठी स्वप्ने आणि चांगली मूल्ये असलेल्या एका १९ मध्यमवर्गीय मुलगी अनु आणि आपल्या शिस्त आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्वासाठी प्रसिद्ध असलेल्या स्वावलंबी व्यावसायिक धनाढ्य ४६ वर्षीय आर्यवर्धन यांच्यातील अनोख्या प्रेमकहाणीला सुंदरपणे दाखवेल. त्यांच्यातील वय, वर्ग, आणि जीवनशैलीत फरक असूनही प्रेम त्यांच्या हृदयांत आपला मार्ग शोधते आणि समाजातील प्रचलित नियमांना आव्हान देते.

लोकप्रिय अभिनेता शरद केळकर आर्यवर्धनची भूमिका साकारत असून तो एका प्रभावशाली आणि तरीही विनम्र व्यवसायिकाच्या रूपात दिसून येईल जो आपली हुशारी, आकर्षकपणा आणि नम्रतेच्या जोरावर आदर कमावतो. त्याच्याकडे संपत्ती आणि प्रतिष्ठा असली तरी त्याची मूल्ये आणि नातेसंबंध त्याच्यासाठी सर्वांत महत्त्वाचे आहेत. तर दुसरीकडे निहारिका चौक्सी अनुची भूमिका जीवंत करत आहे. अनु एक उत्साही, सरळमार्गी आणि प्रेमळ मुलगी असून आपल्या परिवाराला एक चांगले भविष्य मिळावे हे तिचे स्वप्न आहे. ईमानदार आणि निर्धार पक्का असलेल्या ह्या मुलीसाठी प्रेमाचे मूल्य सर्वाधिक असले तरी आपल्या आयुष्यातील जबाबदाऱ्यांनाही ती नीट समजते. अनुच्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिचे प्रेम असलेल्या लोकांवर असलेला तिचा विश्वास. तुम से तुम तक ही मालिका एका जोडलेल्या मध्यमवर्गीय कुटुंबाचा उबदारपणा आणि साधेपणा एका श्रीमंत कुटुंबाची भव्यता आणि सुसंस्कृतपणा यांची अतिशय सुंदर पद्धतीने तुलना करेल. आणि एक मार्मिक प्रश्नही उपस्थित करेल काय प्रेम हे पिढ्या, सामाजिक अपेक्षा आणि सखोल रूजलेल्या परंपरा यांच्यातील अंतर कमी करू शकते?

निहारिका उत्साहात म्हणाली, माझ्यासाठी या शोचा भाग बनणे खूपच रोमांचक आहे! ही एक ताज्या दमाची आणि हृदयाला स्पर्श करणारी प्रेमकथा आहे जे टेलिव्हिजनवर आपल्याला फारसे पाहायला मिळत नाही. ही कथा अतिशय सुंदर पद्धतीने लिहिण्यात आली असून अगदी सुरूवातीपासूनच मी ह्या कथेकडे आकर्षित झाले. ही कथा अतिशय वेगळ्या पद्धतीने प्रेमाचा शोध घेते आणि अनुसारखी खास भूमिका साकारण्याची संधी मला मिळाली यासाठी मी स्वतःला भाग्यवान समजते. ती उत्साही, स्वच्छंदी आणि अनेक बाबतीत अगदी माझ्याचसारखी आहे. सगळेच कलाकार आणि तंत्रज्ञ छान आहेत त्यामुळे सेटवरील प्रत्येक दिवस आनंदात जातो. शरद सरांसोबत काम करणे हा तर माझा सन्मानच आहे. ते एक उत्तम अभिनेता आहेत आणि आपल्या कलेबद्दलचे त्यांचे समर्पण अद्भुत आहे. आम्ही चित्रीकरणाला नुकतीच सुरूवात केली असून आपल्या व्यक्तिरेखेची तयारी ते कसे करतात आणि त्यांची सहज स्क्रीन उपस्थिती अशा अनेक गोष्टी मी त्यांच्याकडून शिकत आहे. प्रेक्षकांनी आमची ही मालिका पाहावी यासाठी मी अतिशय उत्सुक आहे आणि मी आशा करते ती बनवताना आम्हांला जेवढी आवडत आहे तेवढीच प्रेक्षकांनाही पाहताना आवडेल. तुम से तुम तक प्रेक्षकांना प्रेम, द्वंद्व, आणि सामाजिक दबावांनी भरलेल्या एका भावनिक प्रवासावर घेऊन जाईल. काय अनु आणि आर्यवर्धन यांचं प्रेम काळाची कसोटी, कुटुंबाच्या अपेक्षा आणि जगाच्या बारीक नजरांना तोंड देऊ शकेल?

# ॲमेझॉनतर्फे १.२ कोटीहून अधिक उत्पादनांवर शून्य रेफरल शुल्क जाहीर

**बंगळुरू, २४ मार्च :** ॲमेझॉन इंडियाने आज Amazon.in वर देशभरातील लाखो लघु व्यवसायांना पाठबळ देण्यासाठी आतापर्यंतच्या सर्वाधिक विक्रेता शुल्क कपातीची घोषणा केली. Amazon.in वरील विक्रेत्यांच्या वाढीस चालना देण्यासाठी कंपनीने ३०० रु. पेक्षा कमी किमतीच्या १.२ कोटींहून अधिक उत्पादनांवर शून्य रेफरल शुल्क लागू केले आहे. रेफरल शुल्क म्हणजे विक्रेते प्रत्येक विक्री झालेल्या उत्पादनासाठी ॲमेझॉनला देत असलेले कमिशन. आता हे शून्य रेफरल शुल्क १३५ हून अधिक उत्पादन श्रेणींवर लागू झाले आहे.

ॲमेझॉनने Easy Ship आणि Seller Flex सारख्या बाह्य पूर्तता चॅनेल्स वापरणाऱ्या विक्रेत्यांसाठी सरळ, सुलभ फ्लॅट दर देखील लागू केला आहे. त्यामुळे राष्ट्रीय शिपिंग दर आता ६५ रु. पासून सुरू होणार असून यापूर्वी हा दर ७७ रु. होता. Easy Ship हा एक फुलफिलमेंट चॅनेल असून तिथे ॲमेझॉन विक्रेत्यांच्या ठिकाणाहून पॅकेजेस गोळा करते आणि ग्राहकांपर्यंत पोहोचवते. तर Seller Flex च्या अंतर्गत ॲमेझॉन विक्रेत्यांच्या गोदामाचा काही भाग ॲमेझॉन पूर्तता केंद्र म्हणून व्यवस्थापित करते.

याशिवाय, कंपनीने १ किलोपेक्षा कमी वजनाच्या हलक्या उत्पादनांसाठी वजन हाताळणी शुल्क १७ रु. पर्यंत कमी केले आहे. त्यामुळे विक्रेत्यांना ॲमेझॉनला भरावे लागणारे एकूण शुल्क कमी होणार आहे. एकाच वेळी एकापेक्षा जास्त युनिट्स पाठवणाऱ्या विक्रेत्यांना दुसऱ्या युनिटवर विक्री शुल्कात ९०% हून अधिक बचत करता येणार आहे. या बदलांमुळे विक्रेत्यांना अधिक विस्तृत निवड उपलब्ध करून देता येईल, अधिक कार्यक्षम ऑफर्स सादर करता येतील आणि त्यांचा व्यवसाय वाढवता येईल. हे सुधारित शुल्क ७ एप्रिल २०२५ पासून लागू होईल.

ॲमेझॉन इंडियाच्या सेलिंग पार्टनर सर्व्हिसेसचे संचालक अमित नंदा म्हणाले, ॲमेझॉन इंडियामध्ये, आम्ही सर्व विक्रेत्यांचा विकास सक्षम करण्यासाठी वचनबद्ध आहोत कारण आम्हाला ठाम विश्वास आहे की त्यांच्या यशात आमचे यश सामावलेले आहे. कोट्यवधी उत्पादनांवरील रेफरल शुल्क हटवून आणि शिपिंग खर्च कमी करून, आम्ही विक्रेत्यांसाठी Amazon.in वर विक्री करणे अधिक फायदेशीर बनवत आहोत. हा उपक्रम विक्रेत्यांना विशेषतः दैनंदिन कमी किमतीच्या वस्तूंवर अधिक व्यापक निवड सादर करण्यास आणि ग्राहकांसाठी अधिक कार्यक्षम योजना सादर करण्यास मदत करेल. आमच्या कामकाजात कार्यक्षमता वाढत असताना, आम्ही त्या फायद्यांचा लाभ आमच्या विक्रेत्यांना आणि ग्राहकांना मिळेल हे सुनिश्चित करतो.

शून्य रेफरल शुल्क आणि कमी शिपिंग खर्च यांचा एकत्रित परिणाम म्हणून विक्रेत्यांसाठी मोठ्या प्रमाणात बचत होईल.

# भारतात सॅमसंगचा सर्वात किफायतशीर एआय-पॉवर्ड स्मार्टफोन 'गॅलॅक्सी ए२६ ५जी' लाँच, किंमत फक्त २२,९९९ रूपयांपासून

**गुरूग्राम, २६ मार्च :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने एआयची क्षमता असलेला सर्वात किफायतशीर स्मार्टफोन गॅलॅक्सी ए२६ ५जी च्या लाँचसह एआय डिमोक्रेटायझेशनच्या मर्यादांना दूर करणे सुरूच ठेवले आहे. विनासायास अनुभवासाठी डिझाइन करण्यात आलेला गॅलॅक्सी ए२६ ५जी स्टाइल, टिकाऊपणा, कार्यक्षमता व नाविन्यतेचे संतुलित संयोजन देतो, जो दैनंदिन वापरासाठी परिपूर्ण निवड आहे.



सॅमसंगने गॅलॅक्सी ए२६ ५जी मध्ये ऑसम इंटेलिजन्सची भर केली आहे, ज्यामुळे दैनंदिन टास्क्स स्मार्टपणे व सहजपणे करता येतात. इंटेलिजण्ट एआय सूट सर्कल टू सर्च विथ गुगल, एआय सिलेक्ट, ऑब्जेक्ट इरेजर, माय फिल्टर्स अशा सर्वोत्तम वैशिष्ट्यांसह युजर अनुभव उत्साहित करते.

गेल्या वर्षी गॅलॅक्सी ए सिरीज डिवाईसेसवरील चाहत्यांचे आवडते सर्कल टू सर्च विथ गुगल वैशिष्ट्य आता फोटोंच्या पलीकडे जात वापरकर्त्यांना गाणी ओळखण्यास, माहिती शोधण्यास आणि किमान प्रयत्नांसह त्वरित कृती करण्यास मदत करते. नवीन अपडेट्ससह वापरकर्ते आता त्यांच्या फोनवर अधिक टास्क्स करू शकतात. सर्कल टू सर्च विथ गुगल त्वरित स्क्रिनवरील फोन क्रमांक, ईमेल ॲड्रेसेस व यूआरएल ओळखेल, ज्यामुळे वापरकर्ते किमान प्रयत्नासह कृती करू शकतात.

गॅलॅक्सी ए२६ ५जी मध्ये ऑब्जेक्ट इरेजर देखील आहे, जे वापरकर्त्यांना फोटोंमधील नको असलेले घटक दूर करण्यास मदत करते. वापरकर्ते मॅन्युअली किंवा ऑटोमॅटिकली नको असलेले घटक निवडू शकतात, ज्यामुळे काही टॅप्समध्ये सुस्पष्ट, अधिक आकर्षक इमेज मिळू शकते.

एआय सिलेक्ट सिंगल क्लिकमध्ये माहितीचे त्वरित शोध व सादर करत संदर्भ समजण्यास मदत करते. माय फिल्टर्स वापरकर्त्यांना त्यांचे वैयक्तिकृत फिल्टर्स तयार करण्यास सक्षम करते. हे नाविन्यपूर्ण वैशिष्ट्य वापरकर्त्यांना त्यांच्या पसंतीनुसार फोटोंचा लुक व फिल बदलण्यास मदत करते, जेथे ते रंग व स्टाइल्सचा वापर करून नवीन फोटो तयार करू शकतात. भावी प्रोजेक्ट्स सहजपणे उपलब्ध होण्यासाठी कॅमेरा ॲपमध्ये प्रत्येक कस्टम फिल्टर सोईस्करपणे सेव्ह करण्यात आले आहे, ज्यामधून अधिक वैयक्तिकृत व सर्जनशील फोटोग्राफी अनुभव मिळतो.

# ८१% भारतीय आपल्या जीवन विम्याच्या गरजेला कमी महत्त्व देतात : बजाज आलियांझ लाइफ अंडरइन्शुरन्स सर्व्हे

**मुंबई, २६ मार्च :** भारतातील आघाडीच्या खासगी जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या बजाज आलियांझ लाइफ इन्शुरन्सने अंडरइन्शुरन्स सर्व्हे २०२५ या सर्वसमावेशक अभ्यासाचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. यांच्या सहकार्याने करण्यात आलेल्या या सर्वेक्षणामध्ये मेट्रो, टियर १ आणि टियर २ शहरांतील २,००० व्यक्तींचा समावेश होता. या सर्वेक्षणातून भारतातील जीवन विमा कव्हरेजच्या पातळीचे मूल्यमापन करण्यात आले आणि आर्थिक सुरक्षेतील तफावती ओळखण्यात आल्या. निष्कर्षांमधून भारतातील जीवन विम्याची सद्यस्थिती आणि खरेदी निर्णयांवर परिणाम करणारे प्रमुख घटक समोर आले आहेत.

सर्वेक्षणातून जीवन विमा ट्रेंडमध्ये मोठा बदल दिसून आला आहे, पहिल्यांदाच विमा खरेदी करणाऱ्यांचे सरासरी वय ३३ वरून २८ वर्षांपर्यंत घसरले आहे. कुटुंबाची जबाबदारी, उत्पन्नाची पातळी आणि आरोग्यविषयक चिंता हे विमा घेण्यामागील प्रमुख कारणे म्हणून समोर आले आहेत. विशेषतः, ८१% उत्तरदात्यांना असे वाटते की, त्यांच्या वार्षिक उत्पन्नाच्या १० पटपेक्षा कमी जीवन विमा आर्थिक सुरक्षिततेसाठी पुरेसा आहे. मात्र, प्रत्यक्ष कव्हरेजच्या आकडेवारीत मोठी तफावत दिसून येते. शहरी भागात सरासरी जीवन विमा कव्हरेज ३.१ पट वार्षिक उत्पन्नाच्या इतके आहे, तर मास अफ्लुयुएंट आणि अफ्लुयुएंट कुटुंबांसाठी हे अनुक्रमे २.९ पटपर्यंत घटते.

सर्वेक्षणाच्या निष्कर्षांवर भाष्य करताना, बजाज आलियांझ लाइफ इन्शुरन्सचे एमडी आणि सीईओ, तरुण चुग म्हणाले, भारत हा जगातील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक असला, तरी एकूण सम ॲश्युअर्ड केवळ च्या ७०% इतकी आहे, जी अमेरिका (२५१%), थायलंड (१४३%) आणि मलेशिया (१५३%) यांसारख्या देशांच्या तुलनेत लक्षणीयरीत्या कमी आहे. यामुळे संरक्षणातील मोठी तफावत स्पष्ट होते. ही कमतरता कुटुंबांना आर्थिकदृष्ट्या असुरक्षित स्थितीत टाकू शकते, जिथे त्यांना संकटाच्या वेळी साठवलेली बचत वापरण्याची किंवा मालमत्ता विकण्याची वेळ येऊ शकते, ज्यामुळे त्यांच्या जीवनातील महत्त्वाचे उद्दिष्टे कोलमडू शकतात.

## आज का अंदाज

गुरूवार २७ मार्च २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ५ | ८ | ४ | ५ | ६ | ९ |
| १५५ | ५७० | ३३९ | १७० | २६६ | ११३ | ६०० | १३५ |
| २२७ | ६६० | १२२ | ३५० | ६९९ | ३६६ | ७९० | ३६० |
| ३८० | ४८० | ५०० | २६० | ७७० | २३० | ८८० | ५६८ |
| १८ | २० | ५६ | ८६ | ५१ | ३२ | ६८ | ९८ |
| १९ | २९ | ५४ | ८४ | ५० | ३० | ६३ | ९३ |
| १७ | २७ | ५३ | ८३ | ५७ | ३८ | ६२ | ९२ |

२७ मार्च: सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| ३९ | ६९ | ७८ | ०८ |
| ३१ | ६१ | ७५ | ०५ |
| ३३ | ६६ | ७७ | ०० |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## राशीभविष्य

**मेष :** कोणत्याही गंभीर आजाराची भीती आणि गोंधळ दूर होईल. दुःस्वप्न येऊ शकतात. झोपेच्या कमतरतेमुळे तुम्हाला रात्रभर झोप येत नाही. जास्त काळजी करू नका आणि खूप नकारात्मक विचार करू नका.

**वृषभ :** कोणतेही मोठे निर्णय लवकर घेऊ नका. तुम्हाला तुमच्या आईकडून आर्थिक मदत मिळेल. वाहन खरेदीची योजना यशस्वी होईल. कुटुंबातील काही शुभ कार्यासाठी विचारपूर्वक पैसा खर्च करा.

**मिथुन :** सामाजिक कायार्ची आवड वाढेल. तुमचे वर्तन चांगले ठेवण्याचा प्रयत्न करा. नोकरीच्या ठिकाणी संघर्ष केल्यानंतर यश मिळेल. सहकाजयांशी सामंजस्याने वागा. राजकारणातील महत्त्वाच्या मोहिमेची कमान मिळेल.

**कर्क :** आज कौटुंबिक जबाबदाजयांचे ओझे वाढू शकते. नातेवाईकांशी समन्वय ठेवा. वाद वगैरे होण्याची शक्यता राहील. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. तुम्ही जे बोलाल ते विचार करून सांगा.

**सिंह :** आज आर्थिक बाबतीत येणाजया अडचणी कमी होतील. उत्पन्नाचे स्रोत वाढण्याची शक्यता आहे. घर व वाहन खरेदीची योजना आखली जाईल. याबाबतीत तुम्हाला मित्रांचे सहकार्य मिळू शकते.

**कन्या :** वैवाहिक जीवनात शंका-कुशंका टाळा. अन्यथा, प्रेमसंबंधातील तणावासोबतच अंतरही वाढू शकते. आज शारीरिक आरोग्यापेक्षा मानसिक स्वास्थ्य चांगले राहील. जुने कर्ज फेडण्यात यश मिळेल.

**तुळ :** राजकारणातील तुमचे धाडस आणि शौर्य पाहून तुमचे विरोधकही चक्रावून जातील. नोकरीत तुमच्या कार्यशैलीचे कौतुक होईल. प्रेमसंबंधात पैसा आणि भेटवस्तूंचा लाभ होईल.

**वृश्चिक :** नवीन व्यवसाय सुरू करणे फायदेशीर ठरेल. व्यवसायात नवीन सहयोगी मिळतील. तुमच्या नोकरीत तुम्हाला हवे ते करायला मिळेल. प्रिय व्यक्तीमुळे समाजात तुमचा मान आणि प्रतिष्ठा वाढेल.


**धनु :** आज तुमचे आरोग्य चांगले राहील. प्रिय व्यक्ती आणि मित्रांच्या उपस्थितीमुळे मानसिक शांती आणि आराम मिळेल. त्यामुळे तुमच्या शारीरिक आरोग्यावर सकारात्मक परिणाम होईल.

**मकर :** काम पूर्ण होईपर्यंत इतर कोणाशीही चर्चा करू नका. कामाच्या ठिकाणी ताण वाढू शकतो. आज तुम्हाला व्यवसायात भाऊ बहिणींचे सहकार्य मिळेल. शक्तीशी संबंधित लोक त्यांच्या शत्रूंवर विजय मिळवतील.

**कुंभ :** नवीन बांधकामात प्रगती होईल. राजकारणात तुमचे वर्चस्व प्रस्थापित होईल. आज नोकरीत बढतीची शक्यता आहे. व्यवसायात तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून सहकार्य आणि साहचर्य मिळेल.

**मीन :** पूर्वीपासून असलेले हृदयविकार, रक्ताचे विकार, मधुमेह आणि दमा या आजारांनी ग्रस्त असलेल्यांना मात्र त्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागेल. राजकारणात महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील.

## शब्दकोडे क्रमांक २०६७



**आडवे शब्द :-**

१) भारताचा राष्ट्रीय पक्षी
३) टाळता न येणारे
५) जमीनदार
७) शपथ
९) वैरभाव, शत्रुत्व
१०) शर्त
११) निमित्त
१२) वाघाची मावशी
१३) किरकिर, गडबड, त्रास
१५) एक सुगंधी फूल
१६) विशेष
१८) सोन्याचा पार्वत
२१) कुबेराचा सेवक
२३) भात शिजतानाचा आवाज
२५) ढगाळ हवा
२६) गावाखालची जमीन
२८) वस्तूनिर्मितीची जागा
३०) गंध
३१) अस्वल
३२) रवाळ
३३) श्रीमंत माणूस
३६) आकडा, मांडी
३८) चरण
३९) इंद्र
४०) अनुमती
४१) धमकी
४२) एकटा
४३) प्रत्यक्ष कृती
४५) एक उन्हाळी सुगंधी फूल
४९) कबूतर
५०) जोडीदार, मदतनीस
५३) स्थळ, ठिकाण
५५) सदोदित
५८) आठवण
६०) सप्तस्वरातील पहिला स्वर
६१) मत्स्य
६२) सूर्य, चंद्र
६३) नंतर
६५) पशू, जनावर
६६) नाविकदल
६८) जन्म मृत्यू
७१) बडबड्या
७२) विल्हेवाट, निकाल
७३) नाकावरील मोत्याचा दागिना
७४) एक प्रश्नार्थक शब्द

**उभे शब्द :-**

१) मधुमक्षिका
२) अतिशय रूक्षता
३) आठाचा समूह
४) दारावरील खुणेचा आवाज
५) स्तुती करणारा
६) शरीर
७) भारताचा नागरिक
८) पदार्थाचा सूक्ष्म भाग
१०) तर्क, अनुमान
११) आजच्या आधीचा दिवस
१४) हट्ट, दुराग्रह
१५) धनी
१७) राजवाडा
१९) आकाश
२०) एक नशा आणणारा पदार्थ
२२) माफ
२३) रम्य
२४) चेष्टा, उपहास
२५) मज्ञाव
२७) लहान, सूक्ष्म, पातळ
२९) क्षारयुक्त पाणी
३०) शाब्दिक भांडण
३२) कपाळ फुटणे
३४) बेचव
३५) परस्त्रीशी संग करणारा, यार
३६) स्वीकारणे, पतकरणे
३७) ठाणवई
४१) औषध
४२) पटाईत
४४) कणीदार पीठ
४६) दुःख, खेद
४७) रक्तवाहिनी
४८) चुलता
५१) कापडाचा एक प्रकार
५२) वीस दस्त्याचे पुडके
५४) एखाद्याच्या विरुद्धच्या तक्रारी
५५) खरगोश
५६) बिना वासाचे पांढरे फूल
५७) ऐक्य, तादाम्य
५९) संगीतातील एक राग
६१) एक सुगंधी वनस्पती
६४) प्रस्थान करणे
६५) जीव
६६) आरोप, संशय
६७) खवा
६९) व्यापारातील फायदा
७०) पौराणिक अश्ववाहन

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर








# दीपिकाची नाराजी

मातृत्वाचा आनंद घेण्यात मग्न असणारी अभिनेत्री दीपिका पदुकोण सध्या रुपेरी पडद्यापासून काहीशी दूर असली तरी ती सोशल मीडियावर सक्रिय आहे. अलिकडेच या माध्यमावर तिने एक मत मांडले आणि त्याला चाहत्यांकडून भरपूर प्रतिसाद मिळाला. अनेक भारतीय चित्रपट प्रतिष्ठित ऑस्कर पुरस्कार जिंकण्यास पात्र असणारे होते, परंतु त्यांना ती मान्यता मिळाली नसल्याचे मत यावेळी तिने व्यक्त केले. दीपिकाने तिच्या इंस्टाग्रामवर व्हिडिओ शेअर करत ही भावना व्यक्त केली. यामध्ये ती एका शोसाठी (लुई व्हिटॉन) तयार होत असल्याचे दिसून आले.

दीपिका ही जागतिक लक्झरी फॅशन हाऊस असणाऱ्या 'लुई व्हिटॉन'ची राजदूत म्हणून निवडलेली पहिली भारतीय अभिनेत्री आहे. त्याच व्हिडिओमध्ये 'आरआरआर' चित्रपटातील 'नाटू-नाटू' या गाण्याला ऑस्कर पुरस्कार मिळाला तेव्हा तिथे आपण उपस्थित असल्याची आठवण तिने शेअर केली आहे. ही अभिनेत्री पुढे म्हणते की, 'ऑल वी इमॅजिन अॅज लाईट' आणि 'लापता लेडीज' या भारतीय चित्रपटांना जागतिक स्तरावर प्रशंसा मिळाली आहे. तथापि, या चित्रपटांना ऑस्कर २०२५ च्या अंतिम यादीत स्थान मिळाले नाही. त्यामुळे माझ्यासह अनेक भारतीयांचे मन दुखावले आहे. मात्र एड्रियन ब्रॉडीला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला तेव्हा मला खूप आनंद झाला, असेही तिने स्पष्ट केले. 'द ब्रुटालिस्ट' चित्रपटासाठी एड्रियनने यावर्षीचा दुसरा ऑस्कर जिंकला आहे.

या प्रतिक्रियामध्ये दीपिकाने ऑस्करमध्ये भारतीय चित्रपटांना आणि प्रतिभेला मिळणाऱ्या मान्यतेच्या अभावावर अधिक भर दिल्याचे दिसते. ही अभिनेत्री म्हणते, भारताला अनेक वेळा ऑस्कर नाकारण्यात आले आहे. पुरस्कारांना पात्र असणारे अनेक चित्रपट आणि कलाकारांना दुर्लक्षित करण्यात आले. याबाबत दीपिका नाराजी व्यक्त करताना दिसत आहे. दीपिका पदुकोणच्या कामाबद्दल बोलायचे झाले तर, ती शेवटची 'सिंघम रिटर्न्स' मध्ये दिसली होती. या चित्रपटात तिने एका पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारली होती. याशिवाय ती 'कलकी २८९८ एडी' मध्येही दिसली होती. आता त्याच्या सिक्वेलमध्येही ही अभिनेत्री दिसणार आहे. तेव्हा लवकरच ही रुपगर्विता रुपेरी पडद्यावर दिसण्याची अपेक्षा व्यक्त करायला हरकत नाही.

# सलमानच 'सिकंदर'?



सलमान खान गेल्या ३६ वर्षांपासून चित्रपटसृष्टीत सक्रिय आहे. आपल्या शानदार कारकिर्दीत त्याने अनेक उत्तम चित्रपट दिले आहेत. बॉक्स ऑफिसवर सर्वाधिक १०० कोटी कमाई करणाऱ्या १७ चित्रपटांचा विक्रमही भाईजानच्या नावावर आहे. सलमानच्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांबद्दल बोललो तर 'बजरंगी भाईजान' आणि 'सुलतान' ही नावे तुमच्या डोळ्यासमोर येतील. पण त्याचा आणखी एका ब्लॉकबस्टर चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर या दोन्ही चित्रपटांपेक्षा जास्त व्यवसाय केला आहे. म्हणूनच हा विक्रम मोडणे त्याच्याच आगामी 'सिकंदर'समोरचे मोठे आव्हान असणार आहे.

२००९ मधील 'वॉन्टेड' चित्रपटानंतर सलमान खानच्या अभिनय कारकिर्दीत मोठा बदल झाला. तेव्हापासून त्याने कधीही मागे वळून पाहिले नाही. त्याचे बहुतेक चित्रपट १०० कोटींचा टप्पा ओलांडताना दिसले. मात्र सलमानच्या कारकिर्दीतील देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट बघायचा तर तो स्पाय थ्रिलर 'टायगर जिंदा है' हा आहे. होय, २०१७ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर तब्बल ३३९ कोटी रुपयांचा निव्वळ व्यवसाय केला होता. 'सुलतान' आणि 'बजरंगी भाईजान' त्याच्या खूप मागे आहेत.

'टायगर जिंदा है' ने ३३९ कोटी कमावले तर 'बजरंगी भाईजान'ची कमाई ३२० कोटी आणि 'सुलतान' ची ३०० कोटी इतकी होती. या दृष्टिकोनातून पाहिले तर सलमान खानच्या आगामी 'सिकंदर' समोर 'टायगर जिंदा है' चे रेकॉर्ड तोडण्याचे मोठे आव्हान असेल. तथापि, दिग्दर्शक एआर मुरुगदास यांचा 'सिकंदर' सलमानच्या कारकिर्दीतील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट बनू शकतो, असा चाहत्यांना विश्वास आहे.

'सिकंदर'ची क्रेझ आता शिगेला पोहोचली असून चित्रपटाचा बहुप्रतिक्षित ट्रेलर प्रदर्शित झाल्यानंतर तर ती आणखीच वाढली आहे. सोशल मीडियावरही याला सकारात्मक प्रतिसाद बघायला मिळत आहे. हा चित्रपट ईदच्या मुहूर्तावर मोठ्या पडद्यावर प्रदर्शित होत आहे. भाईजानचा 'सिकंदर' ईदच्या दिवशी बॉक्स ऑफिसवर ब्लॉक बस्टर कामगिरी करेल आणि पहिल्याच दिवशी कलेक्शनच्या बाबतीत नवीन विक्रम प्रस्थापित करू शकेल असा अनेकांना विश्वास आहे.

# घेतला जातो प्रभावाचा गैरफायदा

दक्षिण चित्रपटसृष्टीतील अनेक मोठे स्टार कायदेशीर अडचणीत अडकताना दिसत आहेत. अलीकडेच प्रभास, नंदमुरी बालकृष्ण आणि गोपीचंद यांच्याविरुद्ध बेकायदेशीर बेटिंग ॲप्सना प्रोत्साहन दिल्याबद्दल तक्रार दाखल करण्यात आली आहे. विजय देवरकोंडा, राणा दग्गुबती, तमन्ना भाटिया आणि प्रकाश राज यासारख्या दिग्गज अभिनेत्यांवर आधीच कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. आता या यादीत वरील तीन स्टार्सची नावेही जोडण्यात आली असल्याने चर्चेला तोंड फुटणे स्वाभाविक आहे.



यासंबंधी याचिकाकर्ते रामाराव इम्मानानी यांनी सायबर क्राइम पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. यात त्यांनी एका टॉक शो दरम्यान बेकायदेशीर बेटिंग ॲप्सना प्रोत्साहन देण्यात आल्याचा आरोप केला आहे. या खास भागात प्रभास आणि गोपीचंद पाहुणे म्हणून होते तर शोचे सूत्रसंचालन नंदमुरी बालकृष्ण यांनी केले होते.

या ॲपवर विश्वास ठेवून रामाराव यांनी तब्बल ८० लाख रुपये गमावले. सुरुवातीला त्याला काही नफा झाला, पण नंतर मोठे नुकसान सहन करावे लागले आणि ते कर्जात बुडाले. दावा दाखल करताना ते म्हणतात की, हे सेलिब्रिटी आपल्या प्रभावाचा गैरवापर घेत लोकांची दिशाभूल करत असून यामुळे अनेकजण फसव्या योजनांमध्ये अडकत आहेत.

तक्रारदाराचे म्हणणे आहे की, या ॲपद्वारे लोकांना गेम खेळण्याचे आणि गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवले जाते. सुरुवातीला त्यांना काही नफा दिला जातो जेणेकरून अधिक पैसे गुंतवण्यास प्रोत्साहित करता येईल. पण नंतर गुंतवणूकदारांना मोठे नुकसान सहन करावे लागते. स्वाभाविक फसव्या योजनांमध्ये अडकून अनेकजण कर्जबाजारी होतात.

ही बाब उघडकीस येताच सायबर गुन्हे विभागाने तपास सुरू केला आहे. तेलंगणा सरकारने २०१७ मध्ये गेमिंग सुधारणा कायदा लागू केला. त्यानुसार राज्यात ऑनलाइन बेटिंग बेकायदेशीर आहे. अधिकाऱ्यांच्या मते, तक्रारदाराने ज्या ॲप्सवर पैसे गुंतवले होते ते बंदी घातलेल्या चिनी गेमिंग प्लॅटफॉर्मशी जोडलेले असू शकतात. हे केवळ डिजिटल मीडिया नैतिकतेच्या संहितेचे उल्लंघन नाही तर राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोकादेखील मानले जात आहे. त्यामुळे हे प्रकरण पुढे कशी कलाटणी घेते ते बघावे लागेल.



आटीटीवर एक नवीन मालिका आली असून ती बरीच खळबळ माजवत आहे. ओटीटीवरील ट्रेंडिंग असणाऱ्या या कोरियन नाटकाला आयएम डीबीकडून सर्वाधिक रेटिंग मिळाले आहे. पूर्वी 'क्वीन ऑफ टीयर्स' आणि 'स्क्विड गेम' हे सर्वाधिक रेट केलेले के ड्रामा होते. पण आता त्यांची जागा दुसऱ्या कोणीतरी घेतली आहे. या नाटकातील साध्या प्रेमाने लोकांची मने जिंकली आहेत. हा के-ड्रामा आपल्याला शिकवतो की तुम्हाला तारे आणि चंद्र पाडण्याची किंवा तुमच्या जोडीदारासाठी राजवाडा खरेदी करण्याची वा त्यांना मोठ्या गाडीत फिरवण्याची, आलिशान भेटवस्तू देण्याची गरज नाही. काळजी घेऊनही तुम्ही प्रेम व्यक्त करू शकता. या मालिकेत प्रेमाचे टप्पे चार ऋतूप्रमाणे सादर केले आहेत. किम वॉन सेओकने प्रत्येक दृश्य सुंदरपणे चित्रित केले आहे. ५० ते २००० च्या दशकापर्यंत घडणारी या मालिकेची कथा तुम्हाला प्रत्येक दृश्यात गुंतवून ठेवते. 'व्हेन लाईफ गिव्हस यू टेंजेरिन्स' या कथेला अनेक पदर आहेत. ही कथा तुम्हाला ए-शिन आणि ग्वान सिक यांच्यातील अतूट प्रेम दाखवेल तर त्याचवेळी ती वडील-मुलगी आणि आई-मुलीच्या नात्यातही खोलवर घेऊन जाईल.

# ओटीटीवर बघा प्रेमाचे रंग

'व्हेन लाईफ गिव्हस यू टँजेरिन्स' ही १६ भागांची मालिका सध्या नेटफ्लिक्सवर प्रवाहित होत आहे. आतापर्यंत १२ भाग प्रदर्शित झाले आहेत. उर्वरित चार भाग २८ मार्च रोजी प्रदर्शित होतील. हा आतापर्यंतचा सर्वाधिक रेट केलेला के-ड्रामा असून त्याला ९.२ रेटिंग मिळाले आहे.


# शरदकडून अपेक्षाभंग झाला

आपला दमदार आवाज आणि उत्कृष्ट अभिनयासाठी प्रसिद्ध असणारा अभिनेता शरद केळकरला कोणत्याही ओळखीची गरज नाही. शरदने टीव्ही, बॉलिवूड आणि ओटीटीमध्ये अभिनय कौशल्य सिद्ध केले आहे. गेल्या काही काळापासून हा अभिनेता फक्त चित्रपट आणि मालिका करत होता. तो टीव्हीपासून दूर होता. पण आता त्याने शानदार पुनरागमन केले आहे. तथापि, यामुळे चाहते थोडे नाराजही झाले आहेत.

अलिकडेच शरद केळकरचा बहुप्रतिक्षित शो 'तुम से तुम तक'ची घोषणा करण्यात आली. त्याचा प्रोमाही रिलीज झाला. प्रोमोनुसार शोची कथा एका ४० वर्षीय पुरूष आणि १९ वर्षीय मुलीमधील प्रेमाभोवती फिरणारी आहे. 'तुम से तुम तक' ची कथा वय आणि दर्जाच्या या अंतरामुळे दोघांचे मार्ग कसे एकमेकांपासून दूर जातात हे सांगते.



सोशल मीडियावर हा प्रोमो येताच काही लोकांनी शरदवर राग व्यक्त करायला सुरुवात केली. त्याने या शोला हो का म्हटले? असा प्रश्न ते विचारत आहेत. त्यातील एकाने म्हटले की, शरद निहारिकापेक्षा खूप मोठा दिसतो. ते वडील-मुलीच्या जोडीसारखे दिसत आहेत.. निहारिका १९ वर्षांच्या मुलीसारखी दिसते आणि शरद ४० पेक्षा अधिक वर्षांचा दिसतो. दरम्यान एका वापरकर्त्याने म्हटले की, शरद हे करण्यास कसे राजी झाला, हीच मला त्रास देणारी गोष्ट आहे. अर्थात या चाहत्यांच्या भावना झाल्या. प्रत्यक्षात काय घडते आणि पडद्यावर कसे दिसते ते लवकरच कळेल.



# ...आता माफीची मागणी

१४ जून २०२० च्या सकाळी टीव्ही-बॉलिवूड अभिनेता सुशांत सिंग राजपूतच्या मृत्यूने संपूर्ण चित्रपट उद्योग आणि देश स्तब्ध झाला होता. त्याच्या मृत्यूचे गूढ गुंतागुंतीचे झाले तेव्हा हे प्रकरण सीबीआयकडे सोपवले गेले आणि बॉलिवूड अभिनेत्री रिया चक्रवर्तीला मुख्य आरोपी म्हणून घोषित करण्यात आली. सुशांत सिंह राजपूतच्या कुटुंबाने रिया चक्रवर्तीवर सुशांतला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा, त्याचे पैसे हडपून मानसिक छळ करण्याचा आरोप केला होता. या आरोपांनंतर रिया चक्रवर्तीला माध्यमे आणि जनतेकडूनही मोठ्या प्रमाणात टीकेला सामोरे जावे लागले. मात्र आता सीबीआयने सुशांत प्रकरणात क्लोजर रिपोर्ट दाखल केला असून त्यामध्ये रिया चक्रवर्ती आणि तिच्या कुटुंबाला क्लीन चिट देण्यात आली आहे.



पाच वर्षांनी रिया चक्रवर्तीला क्लीन चिट दिल्यानंतर पूजा भट्ट आणि दिया मिर्झा यांनी माध्यमांकडून रियाची लेखी माफी मागितली जावी, अशी मागणी केली आहे. अक्षय कुमारचे ट्विट पुन्हा शेअर करताना पूजा भट्टने लिहिले की, सीबीआयच्या क्लोजर रिपोर्ट सुशांत सिंह राजपूतचा मृत्यू कोणताही कट रचल्याने नव्हे तर आत्महत्या असल्याचे पुष्टी करतो. त्यांनी रिया चक्रवर्ती आणि इतरांना निर्दोष घोषित केले आहे. शेवटी सत्याचा विजय होतो. आमच्या प्रार्थना स्वीकारल्या गेल्या. दिया मिर्झानेही रिया चक्रवर्तीचे समर्थन केले असून या अभिनेत्रीला त्रास देणाऱ्यांकडून लेखी माफीची मागणी केली आहे. तुम्ही फक्त टीआरपीसाठी लोकांना त्रास दिला. तेव्हा आता माफी मागा... असे यावेळी ती माध्यमांना सुनावते.

# लवकरच येणार 'खतरों के खिलाडी'

प्रसिद्ध टीव्ही सेलिब्रिटींना प्राण्यांबरोबर स्टंट करताना, आकाशातून उड्या मारताना किंवा आगीशी खेळताना पाहणे खूप मनोरंजक वाटते. याच कारणास्तव रोहित शेट्टी होस्ट करत असणारा 'खतरों के खिलाडी' लोकांना खूप आवडतो.

'खतरों के खिलाडी' हा टीव्हीवरील सर्वात लोकप्रिय रिॲलिटी शोपैकी एक असून तिथे टीव्ही आणि बॉलिवूडमधील अनेक प्रसिद्ध तारे-तारका येतात आणि धोके स्विकारत आपली प्रतिभा दाखवतात. अशाच १४ हिट सीझननंतर आता प्रेक्षक शोच्या १५ व्या सीझनची आतुरतेने वाट पाहत आहेत. आनंदाची बाब म्हणजे लवकरच त्यांची प्रतीक्षा संपण्याची अपेक्षा आहे.

'खतरों के खिलाडी' सीझन १५ लवकरच सुरू होत आहे. निर्मात्यांनी अद्याप तारीख जाहीर केलेली नसली तरी टीव्ही वर्तुळात स्पर्धकांबद्दल बरीच चर्चा सुरू आहे.



'खतरों के खिलाडी' १५ मध्ये सोशल मीडियावर प्रसिद्ध असणारी आणि इंस्टाग्राम अकाउंटवर २७.५ दशलक्ष फॉलोअर्स असणारी प्रसिद्ध हस्ती येणार असल्याचीही चर्चा आहे. हा सोशल मीडिया सेन्सेशन रियाज अली असून तो टिकटॉक व्हिडिओंमुळे व्हायरल झाला. २१ वर्षीय रियाझची गणना आज सोशल मीडियावरील सर्वात लोकप्रिय निर्मात्यांमध्ये केली जाते. आता तो या शोचा भाग होणार आहे. अर्थात तो निर्मात्यांशी चर्चा करत असला तरी याबद्दल अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र रियाज अली हा शो करण्यास तयार झाला तर त्याचा टीव्ही डेब्यू असेल.

# एकटेपणात सुखी आहे

बॉलिवूडचा स्टायलिश आणि आकर्षक अभिनेता अर्जुन कपूर गर्लफ्रेंड मलायका अरोराबरोबरच्या ब्रेकअपमुळे बराच चर्चेत होता. सुमारे पाच वर्षे रिलेशनशिपमध्ये राहिल्यानंतर अर्जुन आणि मलायका यांनी वेगळे होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या चाहत्यांसाठी हा एक मोठा धक्का होता. तथापि, ब्रेकअपनंतर अभिनेता खूपच आनंदी, सकारात्मक असल्याचे दिसत आहे. अलीकडेच एका अवॉर्ड शो दरम्यान, त्याने सिंगल असण्याबद्दल एक मजेदार गोष्ट सांगितली.



अर्जुन कपूरने अलीकडेच एका शो च्या पारितोषित वितरण समारंभास हजेरी लावली होती. तिथे तो होस्टच्या भूमिकेत होता. निवेदन करताना अविवाहित असल्याबद्दल विनोदाने तो म्हणाला, 'आज मी एकटा आहे. पण एकटे राहण्यात काहीही नुकसान नाही. हे केवळ माझ्यासाठीच नाही तर तुमच्या सर्वांसाठीही फायदेशीर आहे...' यानंतर विनोदाने तो असेही म्हणाला की, एक सूत्रसंचालक म्हणून आता मला जास्त पैसे मिळतील आणि प्रेक्षकांना कमी बकवास ऐकावे लागतील... हे ऐकताच उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून त्याचे कौतुक केले आणि सगळेच त्याच्या हास्यात सामील झाले. अर्जुन कपूर आणि मलायका अरोरा यांचे नाते २०१८ मध्ये सुरू झाले. हे नाते खूप खास होते. दोघेही अनेकदा डिनर डेट्स आणि सुट्टीच्या दिवशी एकत्र दिसायचे. तथापि, अचानक त्यांनी परस्पर संमतीने वेगळे होण्याचा निर्णय घेतल्याची बातमी आली. ब्रेकअपच्या कारणाबाबत कोणतेही अधिकृत विधान नसले तरी आता दोघेही आयुष्यात पुढे जाऊ इच्छितात आणि करिअरवर लक्ष केंद्रित करू इच्छितात हे यामागील सत्य आहे.

असा हा तरुणींचा चाहता अर्जुन कपूर अलीकडे रोहित शेट्टीच्या 'सिंघम अगेन' मध्ये दिसला होता. याशिवाय त्याचा 'मेरे हसबंड की दुल्हन' देखील नुकताच प्रदर्शित झाला ज्यामध्ये त्याच्याबरोबर रकुल प्रीत सिंग आणि भूमी पेडणेकर दिसल्या होत्या. तथापि, हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगला चालला नाही. तेव्हा या देखण्या अभिनेत्याला एका मोठ्या विजयाची गरज आहे, हे नक्की.

# राज्य शासनाची प्रमुख मुख्यालये नागपुरात स्थानांतरित करा

## आमदार दटके यांची सभागृहात मागणी

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २६ :**



नागपूर कराराप्रमाणे राज्य शासनाने मुंबई- पुण्यात असलेली राज्य शासनाची १६ कार्यालये नागपूरमध्ये स्थानांतरित करा, अशी मागणी भाजपचे आमदार प्रवीण दटके यांनी विधानसभेत केली.

दटके यांनी विधानसभेत नागपूर कराराचा उल्लेख करीत राज्य शासनाच्या विविध विभागाच्या मुख्यालयाची यादी सभागृहात वाचून दाखवली.

दटके म्हणाले, राज्यातील कृषी संचालक, शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालक, क्रीडा संचालक, पशुसंवर्धन संचालक, सहकार आयुक्त, संचालक नगर नियोजन, मुख्य वन संरक्षक, आयुर्वेद संचालक, संचालक भूजळ सर्वेक्षण, मुख्य अधीक्षक तुरुंग, मुख्य अधीक्षक निबंधक, जमाबदी आयुक्त आणि भूलेख संचालक, संचालक सार्वजनिक आरोग्य, संचालक सामाजिक कल्याण ही १६ कार्यालये नागपुरात असणे आवश्यक असतांना वन संरक्षक कार्यालय वगळता इतर सर्व कार्यालये पुण्यातच आहेत.

विदर्भात गेल्या ६० वर्षात औद्योगिकरण न झाल्यामुळे व शासकीय कार्यालयेही पुणे, मुंबईत असल्यामुळे विदर्भातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुला- मुलींना योग्य संधी मिळाली नाही तसेच विदर्भात उद्योग क्षेत्राचा विकासही झाला नाही.

त्यामुळे नागपूरसह विदर्भात जास्तीत जास्त गुंतवणूक आणावी आणि शासकीय कार्यालये नागपुरात स्थानांतरित करावे अशी मागणी प्रवीण दटके यांनी केली.

यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले, सोमवारी कॅबिनेट मध्ये नागपुरातील गुंतवणुकीसंदर्भात निर्णय झाला असून शासकीय कार्यालयांबाबत तपासून निर्णय घेऊ असे आश्र्वासित केले.

मंगळवारी राज्य शासनाने विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक औद्योगिक प्रकल्पांना मंजुरी दिली. दाओसमध्ये झालेल्या गुंतवणूक करा यापैकी वरील प्रकल्प आहेत. त्यात नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली आणि अमरावती जिल्ह्यातील प्रकल्पांचा समावेश आहे. यातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार असा दावा सरकारतर्फे करण्यात आला.

# नेरी (पुनर्वसन) ठरणार राज्यातील सर्वात मोठे सौरग्राम

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २६ :**

सौरऊर्जेचे महत्त्व जाणत वर्धा जिल्ह्या अंतर्गत आर्वी तालुक्यातील नेरी (पुनर्वसन) या गावाने शंभर टक्के सौरग्राम होण्याचा मान मिळवित राज्यातील सर्वात मोठे सौरग्राम होण्याचा मान मिळविला आह. गाव करी ते राव न करी या म्हणीचा प्रत्यय आणित जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून एकी व दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर ही किमया करुन दाखविली आहे.

सौर ऊर्जेच्या प्रकाशात झळकणाऱ्या या गावात जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून ही किमया साध्य करणाऱ्या या गावाने संपुर्ण राज्यापुढे एक आदर्श निर्माण केला आहे.

महावितरणकडून राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यातील किमान २ गावे १०० टक्के सौर ऊर्जेवर नेण्याची मोहीम सुरु असून या मोहिमेंअर्गत वर्धा जिल्ह्यातील चिचघाट-राठीच्या पाठोपाठ या नेरी (पुनर्वसन) गावातील सर्व १३२ घरगुती ग्राहक आणि ग्रामपंचायतीने त्यांच्या छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारली आहे. या गावाची सौर ऊर्जेची स्थापित क्षमता सुमारे १५० किलोवॅट झाली आहे.





वर्धा शहरापासून ५० किमी तर आर्वी पासून अवघ्या २ किमीच्या अंतरावर असलेले आणि महावितरणच्या आर्वी उपविभागाअंतर्गत असलेल्या नेरी (पुनर्वसन) या गावाला सौरग्राम करण्यासाठी आर्वी पंचायत समितीने या गावात जवळपास वर्षभर असलेल्या स्वच्छ सुर्यप्रकाशाचा वापर करून वीज निर्मिती करणाच्या मानस करित महावितरणच्या अवाहनाला अनुकुल प्रतिसाद देत केंद्र शासनाच्या ह्यपंतप्रधान सुर्यघर मोफत वीज योजनेत सहभागी होण्याचा प्रस्ताव तयार करून वर्धा येथील जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला.

सौरऊर्जेचे महत्व जाणून घेत जिल्हाधिकारी कार्यालयाने देखील त्यास अनुकूल प्रतिसाद देत जिल्हा नियोजन समितीने प्रस्तावास मंजुरी दिली. महावितरण, गावकरी, पंचायत समिती आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या एकत्रित प्रयत्नांतून नेरी (पुनर्वसन) हे गावाचे शंभर टक्के सौर ऊर्जीकरण करुन एकजुटीने सौर उड्डाण यशस्वी केले आहे.

मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, संचालक (संचालन) अरविंद भादीकर, संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांच्या मार्गदर्शनात आणि प्रादेशिक संचालक, नागपूर परेश भागवत, कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर, नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके, वर्धा मंडलाच्या अधीक्षक अभियंता स्मिता पारखी, कार्यकारी अभियंता (प्रशासन) प्रदिप घोरूडे यांच्या पुढाकाराने आर्वी विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत गायकवाड, उपकार्यकारी अभियंता अमित गायकी, सहायक अभियंता रुपेश सोनटक्के प्रधान तंत्रज्ञ रामटेके व बाह्यस्त्रोत तंत्रज्ञ पवन मुंजेवार यांच्या अविरत प्रयासाने नेरी (पुनर्वसन) या गावाला विदर्भातील पहिले सौरग्राम होण्याचा बहुमान मिळाला आहे. या गावाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# शिंदेंकडून उद्धव ठाकरेंना 'मिस्टर बिन' अशी उपाधी

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २६ :**



एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे यांचा उल्लेख 'मिस्टर बिन' म्हणून केला. 'मिस्टर बिन'नी बाळासाहेबांची शिवसेना काँग्रेसच्या डस्टबिनमध्ये टाकली होती, पण आम्ही ती सुरक्षितपणे बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी संविधान व अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मुद्यावरून विरोधकांवर टीकेची झोडही उठवली.

एकनाथ शिंदे म्हणाले की, विरोधक दररोज सकारात्मक गोष्टींकडे, विकासाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करत आहेत. ते संविधान व अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मुद्यावर नेहमीच गप्पा मारतात. पण आम्ही संविधानानुसार कारभार करण्याचा प्रयत्न करत आहोत. विरोधकांना त्यांच्या सोईने संविधान व अभिव्यक्ती स्वातंत्र्याची आठवण होते. पण मर्चंट नेव्हीच्या अधिकाऱ्याला मारताना कुठे होते तुमच्या हातातील संविधान? प्रदीप मोरेला मारले तेव्हा संविधान कुठे होते? केतकी चितळेला तुरुंगात डांबले तेव्हा संविधान कुठे होते? मलिष्काच्या गाण्यामुळे तुम्हाला पोटदुखी झाली, तेव्हा संविधान कुठे होते?

हनुमान चालीसा म्हटली म्हणून राणा दाम्पत्याला तुरुंगात धाडले तेव्हा संविधान कुठे होते? खोट्या केसेस करुन देवेंद्र फडणवीसांना तुरुंगात पाठवण्याचे षडयंत्र रचले तेव्हा कुठे होते संविधान? उद्योजकाच्या घरासमोर बॉम्ब पेरताना कुठे होते संविधान? सचिन वाझे हा काही लादेन नाही म्हणताना संविधान आठवले नाही का? नारायण राणेंना अटक करताना संविधान आठवले नाही का? कंगनाच्या ऑफिसवर बुलडोझर चालवला तेव्हा कुठे होते संविधान? फडतूस म्हणाले त्यांच्या पायाशी लोटांगण घालताना संविधान कुठे होते? अशा विविध प्रश्नांची सरबत्ती शिंदेंनी यावेळी विरोधकांवर केली.

ते पुढे म्हणाले, जे आता सरकारवर संविधानाचा गळा घोटण्याचा आरोप करत आहेत, त्यांनी आमच्या प्रश्नांची उत्तरे द्यावी. त्यांचे बरेच उद्योग आहेत. पण मी ते काढत नाहीत. ते बाहेर काढले तर त्यांना कोरे संविधान घेऊन पळ काढावा लागेल. आता हल्ली कुणीही येतो व संविधान दाखवतो. बाळासाहेब ठाकरे कार्यकर्त्यांच्या मागे उभे राहिले. त्यामुळे शिवसेना मोठी झाली. पण आता काहीजण मिस्टर बिन झालेत. ते सर्वसामान्य शिवसैनिकांना कचरा समजतात. त्यांच्या या वृत्तीमुळेच सर्वजण त्यांच्यापासून दूर गेले, अशी सडकून टीका शिंदे यांनी केली .

# आपले सरकार सेवा केंद्रांची संख्या वाढणार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २६ :**



राज्यातील डिजिटल सेवा अधिक सुलभ आणि प्रभावी करण्याच्या दृष्टीने 'आपले सरकार सेवा केंद्र' यांचे जाळे आणखी विस्तारीत करण्यात येणार आहे. ग्रामिण व शहरी भागातील नागरिकांना शासकीय सेवा सहजपणे उपलब्ध करून देण्यासाठी सेवा केंद्रांची संख्या वाढविण्यात येणार असल्याची घोषणा माहिती तंत्रज्ञान मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांनी आज विधानसभेत केली.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शासकीय सेवा अधिक गतीने आणि सोप्या पद्धतीने नागरिकांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी हे महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. यावेळी मंत्री शेलार यांनी सेवा केंद्रांबाबतचे सुधारित निकषही जाहीर केले.

सुधारित निकषांनुसार, ५००० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींसाठी २ सेवा केंद्रे तर ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींसाठी ४ सेवा केंद्रे देण्यात येणार आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आता १२,५०० लोकसंख्येसाठी २ सेवा केंद्रे देण्यात येणार आहेत.

# एसटी महामंडळाच्या सर्व बसेस टप्प्याटप्प्याने अपारंपरिक इंधनावर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**



राज्यातील एसटी महामंडळाच्या सर्व बसेस टप्प्याटप्प्याने अपारंपरिक इंधनावर म्हणजेच इलेक्ट्रिक आणि एलएनजीवर रूपांतरित करण्यात येणार असून यासाठी नियोजन करण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत दिली.

सदस्य उमा खापरे यांनी पिंपरी-चिंचवड आणि हिंजवडी परिसरातील वाढत्या प्रदूषणाबाबत विधानपरिषदेत प्रश्न उपस्थित केला. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एसटी महामंडळासाठी एकूण ५ हजार १५० इलेक्ट्रिक बसेस खरेदी करण्यात येणार आहेत. त्यापैकी ४५० बसेस खरेदी करण्यात आल्या आहेत. उर्वरित खरेदी टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जाणार आहे.

ते पुढे म्हणाले, एसटीच्या विद्यमान बसेस एलएनजीवर (लिक्विफाइड नॅचरल गॅस) रूपांतरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. एलएनजीच्या पुरवठ्यासाठी आवश्यक करार करण्यात आले आहेत. राज्य सरकारकडून इलेक्ट्रिक वाहन धोरण राबवले जात आहे. राज्यात मोठ्या प्रमाणावर ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारली जात आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, चालू अर्थसंकल्पात ३० लाखांपेक्षा जास्त किमतीच्या ईव्ही वाहनांवर ६ टक्के कर लावण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र, आता तो कर मागे घेण्याची घोषणा सभागृहात केली जाणार आहे.

राज्य सरकारचे उद्दिष्ट आहे की, महाराष्ट्रातील रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांपैकी किमान ८० टक्के वाहने ही इलेक्ट्रिक असावीत. यामुळे प्रदूषण कमी होईल आणि पर्यावरण संवर्धनास मोठा हातभार लागेल, असेही त्यांनी सांगितले.

हिंजवडी परिसरात होणारे प्रदूषण मुख्यतः वाहनांमुळे होत असून त्यासाठी मेट्रो आणि बसेसची कनेक्टिव्हिटी वाढवली जात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जास्तीत जास्त ईव्ही बसेस घेण्यावर भर दिला जात आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था प्रदूषणमुक्त करणे हे सरकारचे धोरण आहे, राज्यातील सर्व शासकीय वाहनेही इलेक्ट्रिक करण्याचे सरकारचे धोरण आहे, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# वाशीम जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी मंत्री दत्तात्रय भरणे यांची नियुक्ती

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २६ :**



वाशीम जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास मंत्री दत्तात्रय भरणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी जबाबदारी सोडल्यानंतर हे पद रिक्त होते. सामान्य प्रशासन विभागाने २६ मार्चला शासन निर्णय निर्गमित करून वाशीम जिल्ह्याच्या नव्या पालकमंत्र्यांची निवड जाहीर केली.

राज्याच्या मंत्रिमंडळात वाशीम जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना स्थान नाही. वाशीमला बहुतांश वेळा बाहेर जिल्ह्यातीलच पालकमंत्री लाभले आहेत. शिवसेनेकडील वाशीम जिल्ह्याचे पाल कमंत्री पद राष्ट्रवादीच्या कोट्यात गेले. त्यानंतर जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांची वर्णी लागली होती.

हसन मुश्रीफ हे कोल्हापूर जिल्ह्यातील कागल मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. कागल ते वाशीम हे भौगोलिक अंतर सुमारे ६३० कि.मी. आहे. एवढ्या लांबवरचे अंतर पार करून हसन मुश्रीफ वाशीम जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी पार पाडू शकतील का? हा प्रश्न होताच.

कोल्हापूरच्या पालकमंत्री पदासाठी आग्रही असलेल्या हसन मुश्रीफ यांची वाशीम जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावर बोळवण करण्यात आल्याने ते नाराज होते. अखेर आज शासन निर्णय निर्गमित करून वाशीम जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी अल्पसंख्यांक विकास मंत्री दत्तात्रय भरणे यांची नियुक्ती केली आहे.

















